अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १५० । शनिवार १४ मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## बळजबरीने धर्मांतर केल्यास १० वर्षांचा तुरुंगवास

### सात लाखांचा दंड; महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ विधानसभेत सादर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई –** बळजबरी तसेच प्रलोभने दाखवून होत असलेल्या धर्मांतरण आळा घालण्यासाठी राज्य सरकारच्या गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ सभागृहात आज सादर करण्यात आले सादर करण्यात आले . विधेयकावर सोमवारपासून तीन दिवस चर्चा होणार असून त्यानंतर मतदान घेण्यात येणार आहे . बेकायदेशीर धर्मांतर केल्यास १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कठोर तरतूद त्यात करण्यात आली असून, अशा प्रकरणांमधील गुन्हे अजामीनपात्र ठरवण्यात आले आहेत.

भारताच्या संविधानाने धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी तो सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्तेच्या अधीन आहे. अनेक प्रकरणांत नागरिकांना नोकरीचे आमिष, मोफत शिक्षण, लग्नाचे वचन किंवा 'दैवी चमत्कार' दाखवून धर्मांतरित केले जाते. हे रोखण्यासाठी हा कायदा आणला जात आहे.

**विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी**

१) आमिषाची स्पष्ट व्याख्या : भेटवस्तू, रोख रक्कम, नोकरी, धार्मिक संस्थांच्या शाळेत मोफत शिक्षण, विवाहाचे वचन किंवा अधिक चांगल्या जीवनशैलीचे प्रलोभन देणे म्हणजे 'आमिष' मानले जाईल.

२) दोषींना कठोर शिक्षा : कलम ३ चे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद (पान ४ वर)

**धर्मांतरासाठी आता ६० दिवस आधी नोटीस**

नवीन नियमांनुसार, जर कोणाला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल, तर त्यांना जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे (सक्षम प्राधिकारी) ६० दिवस आधी तशी नोटीस द्यावी लागेल. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत घोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे. जर प्रक्रिया पाळली नाही, तर ते धर्मांतर शून्यवत (अवैध) मानले जाईल.

**लग्नासाठी केलेले धर्मांतर ठरणार बेकायदेशीर**

केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह न्यायालयाकडून रद्द ठरवले जातील. मात्र, अशा विवाहातून जन्म लेल्या बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले असून, त्यांना आई–वडिलांच्या मालमत्तेत अधिकार मळेल आणि आईची अभिरक्षाही कायम राहील.

**तक्रार कोण करू शकते?**

केवळ पीडित व्यक्तीच नव्हे, तर तिचे आई–वडील, भाऊ–बहीण किंवा रक्ताच्या नात्यातील कोणीही व्यक्ती पोलिसांत प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करू शकते. विशेष म्हणजे, हे सर्व गुन्हे 'दखलपात्र आणि अजामीनपात्र' असतील.

## महत्त्वाचे..

**शिष्यवृत्ती संदर्भातील अडचणी दूर करू : चंद्रकांत पाटील**

मुंबई : राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना राजशी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत दिली. सदस्य योगेश सागर यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य अतुल भातखळकर यांनीही सहभाग घेतला.मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्य शासनाने अनाथ विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर आरक्षण लागू केले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. या आरक्षणामुळे अनेक अनाथ विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि शासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध होत आहे. महाविद्यालयांमध्ये ५० टक्के फी माफी किंवा मुलींसाठी १०० टक्के फी माफी लागू असतानाही प्रवेशावेळी शुल्क भरण्याची सक्ती केल्याच्या तक्रारी आल्यास संबंधित संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल. यासाठी प्रत्येक महाविद्यालयात शिष्यवृत्ती प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे पाटील यांनी सांगितले.

# एसटी महामंडळात १७ हजार पदांची 'महाभरती'

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा : कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणार प्राधान्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : राज्य सरकारने शासकीय पदभरतीचा धडाका लावला असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) लवकरच १७ हजार ४८२ पदांची विशाल भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही महत्त्वाची घोषणा केली असून, या निर्णयामुळे राज्यातील बेरोजगार तरुणांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

या भरती प्रक्रियेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, एसटीमध्ये सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा विचार करून त्यांना नियमित भरतीमध्ये प्राधान्याने संधी दिली जाणार आहे. चालक आणि वाहकांच्या रिक्त जागांमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्थेवर येणारा ताण कमी करणे, हा या भरतीमागचा मुख्य उद्देश असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले. या भरतीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून, लवकरच अधिकृत जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.

केवळ मनुष्यबळच नव्हे, तर एसटीची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी दरवर्षी ५ हजार नवीन बस खरेदी करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यापैकी ३ हजार बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, 'टाटा मोटर्स'ला २१०० बस पुरवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.



**आर्थिक ताण असूनही सवलती कायम**

**एसटी महामंडळ सध्या आर्थिक आव्हानांचा सामना करत असले तरी, सरकारने सामाजिक दायित्व जपले आहे. महिलांसाठी ५० टक्के भाडे सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास या योजनांमुळे एसटीची लोकप्रियता वाढली आहे. एसटी ही ग्रामीण भागातील जीवनरेखा आहे आणि तिला अधिक सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.**

## दोन सख्ख्या बहिणींवर अत्याचार; मुख्य आरोपींसह दोघे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील कान्हूरपठार परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार आणि तिच्या ७ वी मध्ये शिकणाऱ्या धाकट्या बहिणीचा विनयभंग केल्याप्रकरणी पारनेर पोलिसांनी दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. प्रसाद संदीप साळवे आणि अनिल ऊर्फ गुंड्या किशोर साळवे अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे असून, न्यायालयाने त्यांना १६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेत एकूण ७ जणांविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेतील दोन आरोपींशिवाय विशाल हुलावळे, प्रथमेश लोंढे, वैभव लोंढे, शुभम आल्हाट आणि रोहित चत्तर हे पाच आरोपी सध्या फरार आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत.

# वाळूतस्कर, गौण खनिज माफियांवर कारवाई करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आ.आशुतोष काळेंची विधिमंडळात मागणी**



**कोळपेवाडी :** कोपरगाव विधानसभा मतदारसंघात अवैध गौण खनिजाचा उपसा मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. यामुळे मतदारसंघातील कायदा सुव्यवस्था धोक्यात आली असून माती, वाळू आणि मुरूमाची अवैध वाहतूक करणाऱ्या माफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करत आ.आशुतोष काळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन चर्चेदरम्यान या ज्वलंत मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.

आ.आशुतोष काळे यांनी मतदारसंघातील अवैधपणे गौण खनिजाच्या होत असलेल्या उपशाकडे सभागृहाचे लक्ष वेधतांना सांगितले की, कोपरगाव तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीतून दिवसाढवळ्या बेसुमार वाळू उपसा सुरु असून ठिकठिकाणी बेकायदेशीरपणे जमिनीचे उत्खनन सुरू आहे. हा केवळ पर्यावरणाचा ऱ्हास नाही तर यातून मिळणाऱ्या अवैध पैशांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना वावर वाढत आहे. या पैशांच्या बळावर हे माफिया दहशत निर्माण करीत असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अवैध वाळू उपसा थांबवण्यात यावा यासाठी महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित कार्यालयांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेतल्या परंतु महसूल आणि पोलीस प्रशासनाला वाळू उपसा बंद करण्यात अपयश येवून महसूल आणि पोलीस प्रशासनाला न जुमानता गौण खनिजाचा उपसा सुरूच आहे.

गौण खनिज सांभाळण्याची जबाबदारी महसूल विभागाची असून त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनाची आहे. केवळ महसूल विभाग या माफियांचा बीमोड करू (पान ४ वर)

# शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून निर्णय घ्या

### शिर्डी– शिंगणापूर रेल्वेप्रकरणी ना. विखे यांच्या प्रशासनाला सूचना



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** राहुरी शनिशिंगणापूर तसेच पुणतांबा शिर्डी रेल्वे मार्गाच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढील निर्णय करावेत असे निर्देश जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जिल्ह्यातील विविध रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला आ.अमोल खताळ, आ.विठ्ठलराव लंघे यांच्यासह पुणतांबा राहाता आणि राहुरी तालुक्यातील शेतकरी तसेच रेल्वे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुणतांबा शिर्डी रेल्वे मार्गाच्या संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देवून शेतकऱ्यांचा शेतात जाण्यासाठीचा मार्ग बंद होणार नाही याची दक्षता घ्यावी. यापुर्वी शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या म्हणूनच रेल्वे प्रकल्प मार्ग लागला त्यामुळे शेतकऱ्यांवर आता अन्याय करणे उचित नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. त्यामुळे स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांना विश्वासात घेवून निर्णय करावेत. शेतात जाण्याचे मार्ग बंद होणे योग्य नाही.शेतकऱ्यांचे सायपन अधिकृत करून देणे, अंडरपास मंजूर करण्या संदर्भात तसेच पुणतांबा शिर्डी मार्गावरील गाड्यांना पुणतांबा जंक्शनवर थांबा देण्याच्या मागणी संदर्भात बैठकीत चर्चा होवून याबबात रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सकारत्मक निर्णय करण्याचे निर्देश देण्यात आले.

राहुरी शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी काही गावातील जमीनीच्या संपादन प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदवले, आहेत. भूसंपदानामुळे काही भागात जमीनीची विभागणी होत आहे.यापुर्वी विद्यापीठ तसेच मुळा धरणासाठी शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या आहेत.आता रेल्वे प्रकल्पासाठी अधिक भूसंपादन झाल्यास शेतकरी भूमीहीन होईल.आशी बाब उपस्थित शेतकर्यांनी मांडल्याने याबबात रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी फार घाईने निर्णय न करता शेतकऱ्यांच्या भावना विचारात घेवून निर्णय करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या.

## दरडगावात महिलेचा घरात गळफास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मृतदेह आढळल्याने घातपात झाल्याचा नातेवाईकांचा संशय !**

**राहुरी :** १५ दिवसापूर्वी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेल्या ४० वर्षीय महिलेचा दि. १३ मार्च रोजी दुपारच्या दरम्यान राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. ही घटना राहुरी तालुक्यातील दरडगाव येथे घडली असून नातेवाईकांनी चार जणांवर संशय व्यक्त करून महिलेचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला.

या घटनेतील मयत जया नामदेव हारदे, वय ४० वर्षे, रा. दरडगाव, ता. राहुरी, यांनी सुमारे १५ दिवसापूर्वी विषारी औषध (पान ४ वर)

# घरगुती गॅसवर डल्ला मारणाऱ्या हॉटेलवर धाडसत्र



अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** आखातात युद्ध जन्य परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाला गॅस पुरवठा करण्यात तारेवरची कसरत करावी लागत असताना गोरगरिबांच्या गॅसवर डल्ला मारणाऱ्या शिर्डीतील हॉटेल व्यवसायीकावर राहाता तहसिलदारांनी धडक मोहीम राबवत कारवाई केली आहे.

राज्यात एकीकडे गॅसटंचाईचा अगडोंब उसळला असून सर्वसामान्यांची चूल पेटते की नाही हा प्रश्न सध्या सर्वांसमोर उभा आहे. शिर्डीत घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करताना पाच हॉटेलवर कारवाई करत सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यात गॅसच्या तुटवड्यावर उपाययोजना करण्यासाठी तसेच गॅस घरगुती गॅसचा दुरुपयोग टाळण्यासाठी ठोस पावले उचलले आहेत त्याचाच एक भाग म्हणून घरगुती गॅसचा व्यवसायिक वापर होत असेल तर त्या ठिकाणी कारवाई करा, असे आदेश राहाता तहसील कार्यालयास प्राप्त झाले होते.

त्यावर तहसीलदारांनी तत्पर पुरवठा निरीक्षक अधिकारी स्नेहल गायकवाड यांचे पथक तयार करून ज्या ठिकाणी घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक कारणासाठी होतो अशा ठिकाणी रेड करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्नेहल गायकवाड यांच्या पथकाने नगर मनमाड रोड तसेच शिर्डीतील कोते गल्ली या ठिकाणी धाड टाकत पाच ठिकाणी घरगुती गॅसचा व्यावसायिक कारणासाठी वापर केला जात असल्याचे निष्पन्न झाले. त्यामध्ये पुना टी हाऊस कोते गल्ली, हॉटेल नंदादीप, पंजाबी ढाबा नगर मनमाड रोड, सदगुरु ढाबा कोते गल्ली, चंद्रकला कोते यांचे चहाचे दुकान या व्यावसायिक हॉटेलमध्ये घरगुती सिलेंडर वापर करण्यात आले होते. पथकाने त्वरित सदर सिलेंडर जप्त केले असून सदर सिलेंडर साई गणेश गॅस एजन्सीमध्ये जमा करण्यात आले. त्याबाबतचा रिपोर्ट जिल्हाधिकारी यांना पाठवण्यात आला.

दरम्यान सदर गॅसची वाटमारी करणाऱ्यांवर तहसील कार्यालय काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अटी पूर्ण केल्यासच गुंठेवारी प्रस्तावांना मंजुरी– मंत्री डॉ. उदय सामंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गुंठेवारी नियमितीकरणासाठी शासनाने ठरवून दिलेल्या नियम व अटींची पूर्तता करणे आवश्यक असून संबंधित निकष पूर्ण करणाऱ्या प्रस्तावांनाच मंजुरी दिली जाते. आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक अटी पूर्ण न झाल्यास संबंधित प्रस्ताव नाकारले जातात. त्यामुळे गुंठेवारी विकास नियमित करण्यासाठी सर्व निकषांची पूर्तता करणे गरजेचे असल्याचे मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले.

नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेत सदस्य योगेश टिळेकर यांनी याबाबत सूचना उपस्थित केली होती. यावेळी चर्चेत सदस्य प्रविण दरेकर यांनी सहभाग घेतला.

नाकारलेल्या प्रस्तावांमागे मोजणीचा नकाशा उपलब्ध नसणे, अपेक्षेपेक्षा जास्त अतिरिक्त बांधकाम झालेले असणे, केंद्रीय संरक्षण मंत्रालयाचे ना हरकत प्रमाणपत्र नसणे तसेच (पान ४ वर)

**राज्य शासनाने ३० एप्रिल २००१ पासून संपूर्ण महाराष्ट्रात गुंठेवारी विकास नियमितीकरणाचा अधिनियम लागू केला असून त्यानुसार पुणे महानगरपालिकेने शहर सुधारणा समितीमार्फत १२ फेब्रुवारी २०२१ रोजी ठराव करून गुंठेवारी विकास नियमित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासंदर्भात आतापर्यंत ११३३ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ४० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. ७३१ प्रस्ताव नाकारण्यात आले असून ३२७ प्रस्तावांवर सध्या कार्यवाही सुरू आहे.**

**– मंत्री डॉ. उदय सामंत**

# एआय, डिजिटल सुविधा, योजनांमुळे महाराष्ट्रातील शेती सक्षम होणार : कृषीमंत्री भरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील शेती अधिक सक्षम, आधुनिक आणि शाश्वत करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर, डिजिटल सुविधा, शेतकरी कल्याणकारी योजना आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक यामुळे महाराष्ट्रातील शेती क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ च्या उत्तरात सांगितले.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की, हवामानातील अनिश्चितता, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राज्य सरकारने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी महाॲग्री 'एआय' धोरण तयार केले असून असे धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, जनरेटिव्ह 'एआय', ड्रोन आणि रोबोटिक्सचा वापर करून शेतीत आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात सुमारे ४० टक्के वाढ होईल, खतांचा वापर ३० टक्क्यांनी कमी होईल आणि पाण्याची ४० ते ५० टक्के बचत होण्याची अपेक्षा आहे.



कृषीमंत्री भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता यावा यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार असून कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राज्य स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र स्थापन करण्यात आले असून राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये 'एआय' संशोधन आणि इन्क्युबेशन केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. मुंबई येथे नुकतीच 'एआय' फॉर ॲग्री ही आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली असून त्यामध्ये देश-विदेशातील तज्ज्ञांनी शेतीतील नव्या तंत्रज्ञानाबाबत चर्चा केली.

कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार' मोबाईल ॲपद्वारे पिक लागवड, रोगनियंत्रण, पाणी व खतांचा योग्य वापर आणि बाजारभाव याबाबत सल्ला मिळत असून सध्या सुमारे ३० लाख शेतकरी या ॲपचा वापर करत आहेत. तसेच स्मार्टफोन नसलेल्या शेतकऱ्यांसाठी 'वसुधा' 'एआय' आधारित फोन सेवा सुरू करण्यात आली असून १५५३१३ या क्रमांकावर फोन करून शेतकरी मराठीत मार्गदर्शन मिळवू शकतात असे उत्तर मंत्री भरणे यांनी दिले.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्यासाठी कृषी समृद्धी योजना राबविण्यात येत असून सन २०२६-२७ साठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद (पान ४ वर)

**घट्ट नाळ मातीशी आणि अतूट नातं शेतीशी**



शेतकऱ्यांच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, नैसर्गिक शेती, अन्नप्रक्रिया उद्योग आणि पायाभूत सुविधा यावर भर देऊन राज्यातील शेती अधिक सक्षम करण्याचा सरकारचा निर्धार आहे. घट्ट नाळ मातीशी आणि अतूट नातं शेतीशी या भावनेतून कृषी विभाग काम करत असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी शासन कायम कटिबद्ध राहील.

– दत्तात्रय भरणे, कृषीमंत्री

# संपादकीय

## लोकशाहीचा लिलाव आणि 'रेवडी' संस्कृतीचा भस्मासूर

भारतीय लोकशाही सध्या एका विचित्र आणि भयावह वळणावर उभी आहे. जिथे जनसेवा हा शब्द केवळ कोशात उरला असून, 'मत खरेदी' हाच राजकारणाचा मुख्य गाभा बनला आहे. नीती आयोगाने नुकतीच सर्व राज्यांना आर्थिक शिस्त बाळगण्याची आणि करसंकलन वाढवण्याची तंबी दिली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरतेचे ढग दाटलेले असताना आणि देशासमोर आर्थिक आव्हाने उभी असताना, राज्यांनी दाखवलेली ही बेफिकिरी केवळ चिंताजनक नाही, तर ती आत्मघातकी आहे. 'कल्याणकारी राज्य' (थशश्रषरअ‍ॅश डीरींश) आणि 'लाचखोर राजकारण' यातील पुसट होत चाललेली रेषा हा आजच्या भारतीय राजकारणातील सर्वात मोठा नैतिक अध:पात आहे.

पंतप्रधानांनी काही काळापूर्वी मोफत वाटपाच्या या प्रवृत्तीला 'रेवडी संस्कृती' म्हणून हिणवले होते. परंतु, दुर्दैव असे की, खुद्द सत्ताधारी पक्षासह सर्वच राजकीय पक्षांनी या संस्कृतीला जणू राजमान्यता दिली आहे. राज्यांच्या तिजोरीत खडखडाट असताना आणि कर्जाचा डोंगर हिमालयाएवढा झाला असताना, जनतेला 'मोफत'च्या नावाखाली जे काही दिले जात आहे, ती शुद्ध लाच आहे. फरक फक्त इतकाच की, ही लाच अंधारात न देता, सरकारी खर्चाने, जाहिरातींचा गाजावाजा करून आणि 'लाडकी बहीण' किंवा 'लाडली लक्ष्मी' सारख्या भावनिक नावांच्या आवरणाखाली दिली जात आहे.

राज्यांच्या अर्थसंकल्पांकडे नजर टाकली तर भयावह वास्तव समोर येते. तमिळनाडूचे उदाहरण घ्या; या निवडणूक वर्षात तिथल्या सरकारने विविध मोफत योजनांसाठी ९९ हजार कोटींची तरतूद केली आहे, तर प्रत्यक्ष विकासकामांसाठी केवळ ४७ हजार कोटी ठेवले आहेत. म्हणजेच विकासापेक्षा मतदारांना खूश करण्यासाठी दुप्पट खर्च केला जात आहे. कर्नाटकची स्थिती तर त्याहून वाईट आहे; तिथे कर्जाचा बोजा ७ लाख कोटींच्या पार गेला आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि आता महाराष्ट्रही याच आत्मघातकी मार्गावर चालले आहेत. महाराष्ट्राच्या नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पातही निवडणुकीच्या तोंडावर हजारो कोटींच्या मोफत योजनांची खैरात करण्यात आली आहे. आसाममध्ये ४० लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी ९ हजार रुपये जमा करणे, हा तर थेट मतदारांना विकत घेण्याचाच प्रकार म्हणावा लागेल.

कोणतेही राज्य प्रगती करते जेव्हा ते पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्यावर गुंतवणूक करते. मात्र, सध्या गुंतवणूक बाजूला पडली असून केवळ 'रोख वाटप' (उरीह ढअ‍ॅरपीषशअ‍ॅ) सुरू आहे. जेव्हा सरकार रस्त्याऐवजी रोख पैसे देते, तेव्हा ते राज्याचा दीर्घकालीन विकास थांबवत असते. मोफत वीज, मोफत प्रवास आणि थेट बँक खात्यात पैसे जमा करण्याच्या नादात राज्यांची उत्पादक क्षमता नष्ट होत आहे. रिझर्व्ह बँक आणि अर्थतज्ज्ञांनी वारंवार इशारे देऊनही, सत्तेच्या हव्यासापोटी राजकीय नेते वास्तवाकडे पाठ फिरवत आहेत.

या संपूर्ण खेळात सर्वात मोठे नुकसान मतदारांच्या विचारशक्तीचे झाले आहे. सरकारचे कर्तव्य काय? पारदर्शकता, नोकऱ्यांची निर्मिती, उद्योग वाढवणे आणि कायदा सुव्यवस्था राखणे हे सरकारचे मुख्य काम आहे. परंतु, लाचखोरीच्या या संस्कृतीने मतदारालाही 'लोभी' बनवले आहे. ''आमच्यासाठी काय?'' या प्रश्नाचे उत्तर जो पक्ष 'रोख रकमेत' देईल, त्यालाच मत देण्याची प्रवृत्ती बळावत आहे. यामुळे सरकारची कार्यकुशलता तपासण्याचे मोजमापच बदलून गेले आहे. मतदार जेव्हा भरकटतो, तेव्हा राष्ट्रहिताला तिलांजली दिली जाते, हेच आज आपण पाहत आहोत.

न्यायालयांनी यावर ताशेरे ओढले तरी कायद्याच्या चौकटीत राजकीय पक्षांच्या घोषणांना रोखणे कठीण जात आहे. निवडणूक आयोगही आश्वासनांच्या या महापुरात हतबल दिसत आहे. जर नीती आयोग आणि रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थांनी आता कठोर पावले उचलली नाहीत, तर भारताची अवस्था शेजारील दिवाळखोर देशांसारखी व्हायला वेळ लागणार नाही.

राजकारण हे समाज परिवर्तनाचे साधन असण्याऐवजी, ते आता निव्वळ व्यावसायिक सौदेबाजी झाले आहे. 'रेवडी' वाटून निवडणुका जिंकणे हा पराक्रम नसून तो येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्याशी केलेला खेळ आहे. ज्या राज्यांमध्ये रस्ते खड्ड्यात आहेत, जिथे शाळांची दुरवस्था आहे आणि जिथे बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे, तिथे 'मोफत'चे आमिष दाखवणे हा जनतेचा अपमान आहे. आता वेळ आली आहे की, जनतेनेच या मोफतखोरीच्या जाळ्यातून बाहेर पडावे आणि आपल्या हक्काचा विकास मागावा. अन्यथा, ही 'राजरोस लाचखोरी' भारतीय लोकशाहीचा पायाच पोखरून टाकेल.

# अहिल्यानगरच्या ५ लाख ४२ हजार शेतकऱ्यांना मिळाले १०८ कोटी ५० लाख रुपये

### किसान सन्मान योजनेचा २२वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** ,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने शेतकर्यासाठी सुरू सुरू केलेल्या किसान सन्मान योजनेचा २२वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाला असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील ५ लाख ४२ हजार शेतक-यांच्या खात्यात १०८ कोटी ५० लाख रुपये वर्ग झाले आहेत. या योजनेमुळे शेतक-यांना मोठा आधार मिळत असून, योजनेमध्ये राखलेले सातत्य हेच केंद्र सरकारच्या निर्णयाचे यश असल्याचे प्रतिक्रीया जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

केंद्र सरकारने सुरु केलेल्या किसान सन्मान योजनेचा २२ वा हप्ताशेतक-यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला आहे. शेतक-यांसाठी सुरु केलेली ही एक ऐतिहासिक योजना ठरली असून, वर्षाला ६ हजार रुपये थेट बॅंक खात्यात वर्ग होत असल्याने या योजनेचा मोठा दिलासा शेतक-यांना मिळत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.जिल्ह्यातील ५ लाख ४२ हजार ५१४ शेतक-यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे १०८ कोटी ५० लाख रुपये जमा झाले असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, यापुर्वी २१ हप्ते शेतक-यांच्या खात्यात जमा झाल्याने या योजनेबाबत शेतक-यांमध्ये मोठे समाधान आहे.केंद्र सरकारने शेतक-यांसाठी सुरु केलेल्या अनेक योजनांपैकी किसान सन्मान योजना ही महत्वपूर्ण ठरली असून, केंद्र सरकारने सुरु केलेल्या सर्व योजना अखंडीतपणे सुरु आहेत. योजनांच्या अंमलबजावणी मध्ये केंद्र सरकारकडून सातत्य राखले जात असल्याचे त्यांनी सांगितले.अकोले तालुक्यातील ३४ हजार २६२ शेतक-यांना ६ कोटी ८५ लाख, जामखेड २८ हजार ७२६ शेतक-यांना ५ कोटी ७४ लाख, कर्जत ४३ हजार २१४ शेतक-यांना ८ कोटी ६४ लाख , कोपरगाव २९ हजार ३२७ शेतक-यांना ५ कोटी ८६ लाख, अहिल्यानगर ३० हजार ५५७ शेतक-यांना ६ कोटी ११ लाख, नेवासा ५३ हजार ५४६ शेतक-यांना १० कोटी ७० लाख, पारनेर ४९ हजार ६१० शेतक-यांना ९ कोटी ९२ लाख, पाथर्डी ३९ हजार ४९५ शेतक-यांना ७ कोटी ८९ लाख, राहाता २३ हजार ७२९ शेतक-यांना ४ कोटी ७४ लाख, राहुरी ३८ हजार १४६ शेतक-यांना ७ कोटी ६२ लाख, संगमनेर ५८ हजार ४८६ शेतक-यांना ११ कोटी ६९ लाख, शेवगाव ४१ हजार ४४४ शेतक-यांना ८ कोटी २८ लाख, श्रीगोंदा ४९ हजार ९३४ शेतक-यांना ९ कोटी ९८ लाख, श्रीरामपूर २२ हजार ३८ शेतक-यांना ४ कोटी ४० लाख रुपये. अशा रक्कमा तालुका निहाय शेतक-यांच्या खात्यात वर्ग झाल्याचे त्यांनी सांगितले.

## उक्कलगाव हरिहर यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी जगधने

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील हरिहर यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी आदिनाथ मच्छिंद्र जगधने, कचरू रजपूत, सचिवपदी अभिषेक मच्छिंद्र धनवटे, खजिनदार विकास रामदास थोरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.उक्कलगाव येथील ग्रामदैवत श्री हरिहर केशव गोविंद भगवान यात्रोत्सव गुढीपाडव्याच्या मुर्हर्तावर प्रारंभ होणार आहे. याच पार्श्वभूमीवर यात्रा कमिटी व समस्त ग्रामस्थांची बैठक गुरुवारी सकाळी मंदिरात पार पडली. यात यावेळी ठरल्याप्रमाणे सर्व नियोजित धार्मिक कार्यक्रम बैठकीत ठरविण्यात आले. यात्रोत्सव निमित्ताने मदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. याप्रसंगी सरपंच रविना शिंदे, उपसरपंच नितीन थोरात, विश्वस्त रविंद्र जगधने, अनिल थोरात, अ‍ॅड. पुरुषोत्तम थोरात, गुलाबराव गाडेकर, दिलीप थोरात, ज्ञानदेव थोरात, दत्तात्रय कर्डिले, नंदकुमार थोरात, बाबासाहेब थोरात, नितीन फुलपगार, राम नागरे, महेश थोरात, सोमनाथ थोरात, रावसाहेब थोरात, अक्षय थोरात, रामेश्वर मोरे, हरिभाऊ मोरे आर्दीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## एचपीव्ही लस आपल्या मुलींना द्यावी : स्नेहल खोरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** आपल्या मुलींचे आयुष्य सुरक्षित करण्यासाठी एचपीची लस उपयुक्त ठरणार असून कॅन्सरसारख्या भयंकर आजारापासून मुलींना संरक्षण देण्यासाठी ही लस घ्यावी असे प्रतिपादन श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगरसेविका सौ.स्नेहल केतन खोरे यांनी केले आहे.श्रीरामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसबाबत बोलताना स्नेहल खोरे म्हणाल्या की, या लसबाबत नागरिकांकडून जनजागृती होणे गरजेचे आहे. अनेक नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरवली गेल्याने ही लस घेण्याची टाळाटाळ केली जात आहे. मात्र आपण स्वतः आपली मुलगी शौर्यजा हिला ही एचपीव्ही लस दिली असून त्यामुळे कर्करोगापासून बचाव होण्यास मदत होणार आहे. तरी आपण सर्वांनी या लसीचा लाभ आपल्या मुलींना घेऊन द्यावा आणि त्यांचे आरोग्य सुरक्षित करावे असे आवाहन खोरे यांनी केले.यावेळी डॉ.रविना सांगळे, आशासेविका नीता सातदिवे, वैशाली पवार, मंगल पातोरे, रेणुका गायकवाड आदींसह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.



## संस्कृत ऑलंपियाड परिक्षेत खटोड कन्या विद्यालयाचे यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील हिंद सेवा मंडळाच्या खटोड कन्या विद्यालयात संस्कृत प्रतिष्ठानतर्फे आयोजित संस्कृत ऑलिम्पियाड परीक्षा २०२६ (स्तर १) मध्ये उज्वल यश संपादन केले असून या स्पर्धेत ३ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्य पदक तसेच प्रमाणपत्र प्राप्त करून विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. या परिक्षेत एकुण २३ विद्यार्थिनींना सहभाग नोंदविला यातील कु कुंजल जालिंदर गागरे , श्रृती श्रीकांत परभळे , शिवश्री शरद खोत १०० पैकी १०० गुण मिळवून सुवर्ण पदकाच्या मानकरी ठरल्या कु ईश्वरी प्रकाश मेतकर हिला



१०० पैकी ९७ गुण मिळवून रौप्य पदक मिळाले तर कु प्राची चंद्रकांत लाड व गार्गी प्रीतम पांडे यांनी १०० पैकी ९६ गुण मिळवून कांस्य पदक पटकावले आहे.अन्य सर्व विद्यार्थीनी विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत व प्रमाणपत्र मिळाणार आहे. या सर्व विद्यार्थिनींना संस्कृत विषय शिक्षिका श्रीमती शितल गुंजाळ व आदिनाथ जोशी यांचे मार्गदर्शन लाभले सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी , ऊपाध्यक्ष रविंद्र गुलाटी, कार्यकारीणी सदस्य अनिल देशपांडे, अशोक ऊपाध्ये, रणजित श्रीगोड,शाळेचे चेअरमन दत्तात्रय साबळे,ज्यनिअर विभाग चेअरमन डॉ रिमा गोसावी प्राचार्य डॉ मंगला भोसले पर्यवेक्षिका अनिता शिंदे , मंगला डोळस आदींसह शिक्षक व सेवक तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

## चितळी शिवारातून पाणबुडी मोटारीची चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राहातातालुक्यातील चितळी शिवारातून एका शेतकऱ्याची इंधन विहिरीतील पाणबुडी मोटार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहाता तालुक्यातील पूर्व भागातील वाकडी येथील शेतकरी महेश कारभारी जाधव यांची शेजारील चितळी हद्दीत शेती आहे. चितळी शिवारातील गट नंबर ३७३/२ यामध्ये इंधन विहिरीत त्यांची पाणबुडी मोटार होती. या पाणबुडी मोटारीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली. हा प्रकार २३ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते २४ फेब्रुवारी सकाळी ६.३० च्या सुमारास घडला. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात महेश कारभारी जाधव यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय दंड संहिता २०२३ च्या ३०३ (२) प्रमाणे ११६/२०२६ नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बडे हे करीत आहेत.चोरी होवून १५ दिवस झाले तरी पोलीस पंचनाम्यासाठी आलेच नाहीत. दिवसेंदिवस विद्युत मोटारी व अन्य उपकरणांची चोरी होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांना याचा मोठा भुर्दंड बसत आहे. बिबट्यांची मोठी दहशत असल्याने शेतकरी दिवस मावळण्यापूर्वीच शेतातून घरी आलेले असतात. याचा फायदा चोरटे घेतात. त्यातही चोरीच्या फिर्यादीत दाखल करुनही पोलीस या घटनेकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी काय करावे हा मोठा प्रश्न आहे. तपास करण्यात पोलीस यंत्रणा सुस्थावली असल्याचे दिसून येत आहे.

## सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व अ. भा. आयुर्वेद संस्थान यांच्यात सामंजस्य करार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर:**-अहिल्यानगर शहरातील आनंदधाम समोरील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, गोवा यांच्यात सामंजस्य करार केल्याची माहिती संस्थेचे सचिव - डॉ. शिवाजीराव काकडे यांनी दिली.

या करार सही करण्याच्या कार्यक्रमाला भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाचे माननीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव साहेब , आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, अखिल भारतीय आयुर्वेद संस्थानचे संचालक (कार्यभार) प्रा. (वैद्य) पी. के. प्रजापती, अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान गोव्याच्या अधिष्ठाता प्रा. (डॉ.) सुजाता कदम तसेच प्राध्यापकवर्ग आणि अधिकारी उपस्थित होते.

या करारामुळे मुळे आयुर्वेद आणि आधुनिक संशोधन क्षेत्रात नवीन संधी निर्माण होण्यास मोठी चालना मिळणार असून या दोन्ही संस्थांच्या विद्यार्थ्यांना विविध आजारांवरील संशोधनासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला वाव मिळून भविष्यात आरोग्य क्षेत्रात नवे संशोधन घडण्यास मदत होणार असल्याचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे यांनी सांगितले.

वरील उपलब्धी साठी विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे आणि सर्व प्राध्यापक यांचे संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्य हर्षदाताई काकडे, विश्वस्थ पृथ्वीसिंह काकडे, औषधनिर्माण शास्त्रविभागाच्या संचालिका भाग्यश्री काकडे पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी अभिनंदन केले.



## सरकारी यंत्रणांची विश्वासाईता विकली जाऊ नये

वैयक्तिक लोभापाई सरकारी यंत्रणा कोणत्याही परिस्थितीत विकाऊ होता कामा नये. सरकारची बाजू सांभाळणारे त्या त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत विश्वासाईता नोकर वर्गाच्या हातात असते. जर आपल्या देशाची गुपिते विकली गेली तर देशाचे भवितव्य किती कठीण होईल याचा विचार केलेला बरा गेल्याच आठवड्यात नेव्ही मधील एका कर्मचाऱ्याने पाकिस्तानी यंत्रणे बरोबर संधान साधून संवेदनशील माहिती पुरवण्याचा प्रयत्न केला ती बाब चाणक्ष अधिकाऱ्याच्या लक्षात आली आणि त्याच्यावर कारवाई सुरू झाली संबंधित कर्मचाऱ्यांनी यापूर्वी काही माहिती दिली आहे किंवा कसे हे आता तपासले जाईल.आपल्या वैयक्तिक स्वार्थापेक्षा देश मोठा आहे ही भावना मनात असली पाहिजे. देशासाठी बलिदान देणारे लोक कुठे आणि भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबून लाचखोरी करत जनतेचा विश्वासघात करणारे नतदृष्ट लोक कुठे?

सरकारी कार्यालयातील कामाबद्दल लोक समाधानी नाहीत. काहीतरी चिरीमिरी दिल्याशिवाय कामच होत नाही असा लोकांचा अनुभव आहे. आपल्या ' पगारातच भागवू आणि स्वाभिमानाने जगू ' अशी भावना दिवसेंदिवस कमी होत चालले आहे उच्च दर्जाचे अधिकारी सुद्धा लाखो रुपयांची लाच घेताना पकडले जातात हीच त्यांच्यासाठी अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. मंत्रालयातल्या केबिनमध्ये बसून एक रेघ म्हणजे ५० हजार अशा रेघांच्याच्या खेळावर लाच स्वीकारली जात असेल तर मंत्रालयाच्या ''भक्कम '' भिंतीच्या आधाराला चटावलेल्या लोकांकडून काय अपेक्षा ठेवावी?

नमन
श्री. पद्माकर शिंपी
मो.९४२३७८५८७४

सरकारने लोकांचा थेट संपर्क सरकारी कार्यालयांशी असावा व लोकांनी बिनधास्तपणे केलेल्या तक्रारींचा पाठपुरावा करून वाईट यंत्रणांचा कणा मोडण्यासाठी योजना आखल्या आहेत. आपल्याच जिल्हयातील एका व्यक्तिने ११२ क्रमांकावर तकार केली. जागृत पोलिसाने संबंधिताला तक्रारकर्त्यांचे नाव सांगितले, एसपी कार्यालयाकडे तक्रारी चे काय झाले विचारणा केली तर पुन्हा पुन्हा विचारणा करू नका असा सल्ला देऊन आपले कर्तव्य बजावले. म्हणजे सरकारी यंत्रणा नेमक्या कुणासाठी काम करतात हे सहज समजू शकते.

आपल्या पगारातच भागवा आणि समाधानाने व ताठ मानेने जगा !!!

## रस्त्याच्या दुभाजकातील झाडांसाठी पाण्याची व्यवस्था

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर ग्रामपंचायत व सत्यमेव जयते ग्रुपचा उपक्रम**

**श्रीरामपूर :** बेलापूर- श्रीरामपूर रस्त्याच्या दुभाजकात लावलेली झाडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळत चालली असून वारंवार मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल न घेतल्यामुळे अखेर बेलापूर बु ग्रामपंचायत व सत्यमेव जयते ग्रुप बेलापूर यांनी झाडांना पाणी देण्यास सुरुवात केली.या उपक्रमाचे वृक्षप्रेमीकडून कौतुक केले जात आहे.

माजी आमदार लहू कानडे यांच्या विशेष प्रयत्नातून बेलापूर -श्रीरामपूर रस्त्याचे चौपदरीकरण होवून दुभाजकामध्ये वृक्षारोपण करण्यात आले होते.काही काळ त्याचे संगोपन ही व्यवस्थित झाले. परंतु आता कडक उन्हाळा सुरू झाला असून पाणी न दिल्यामुळे ही झाडे शेवटच्या घटका मोजत आहेत. याप्रमाणेच बेलापूर-श्रीरामपूर रस्त्याचे दुतर्फा लावण्यात आलेल्या झाडांचीही दुरवस्था झाली आहे. याकडे बेलापूर ग्रामपंचायत तसेच सत्यमेव जयते ग्रुपने प्रशासनाचे लक्ष वेधले होते. परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही.अखेर संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले यांच्या पुढाकाराने बेलापूर बु ग्रामपंचायत व सत्यमेव जयते ग्रुपने झाडांना पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली.बेलापूर बु ग्रामपंचायतीच्या टँकरव्दारे पाणी दिले जात असून यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी बाबासाहेब प्रधान, अविनाश शेलार,दत्तात्रय वक्ते,सुमित शेलार आदी परिश्रम घेत आहेत. याचप्रमाणे बेलापूर-श्रीरामपूर रस्त्याचे दुतर्फा पावसाळ्यामध्ये झाडे लावण्याचा ठेका एका ठेकेदारांनी घेतला. त्याने पावसाळ्यात ती झाडे लावली परंतु त्यानंतर लावलेल्या झाडांची देखभाल न केल्याने झाडांची दूरवास्था झाली आहे. त्यामुळे ज्या ठेकेदाराने रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून देखभाल करण्याचा ठेका घेतलेला असेल त्या ठेकेदाराकडून जळून गेलेल्या ठिकाणी पुन्हा नवीन वृक्ष लागवड करावी.तसेच लावलेल्या झाडांचे काळजीपूर्वक संगोपन करावे, याबाबत संबंधित ठेकेदाराला सुचना देण्याची मागणी बेलापूर बु ग्रामपंचायतीसह सत्यमेव जयते ग्रुपचे सदस्य संजय भोंडगे, विष्णुपंत डावरे, देविदास देसाई,अभिषेक खंडागळे, राधेश्याम अंबिलवादे,बाबासाहेब काळे, रविंद्र कर्पे, भगीरथ मुंडलिक, दिलीप अमोलिक, बाबुलाल पठाण, विशाल आंबेकर, सचिन कणसे, इस्माईल शेख, इरफान शेख, किरण गागरे, दिपक क्षत्रिय, विलास नागले, प्रा निजाम शेख, सचिन देवरे, पुंजाहरी सुपेकर, महेश कुऱ्हे, सोमनाथ जावरे, जाकीर शेख, महेश ओहोळ, किशोर दायमा, गोपी दाणी, दिलीप दुधाळ, अर्जुन डुकरे, राहुल माळवदे, सलीम शेख आदींनी केली आहे.

# पीडित-अनाथ - विधवा यांना हीं ईदच्या आनंदात सहभागी करून घ्यावे . प्रेषित मुहम्मद स्व. !!

रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर २४

दिव्य कुरआन सांगते, ''जर तुम्ही! आपले दान , जाहीररीत्या दिले तर, हे देखील चांगले आहेत , परंतु, जर गुप्तरितीने तुम्हीं गरजूंना द्याल तर ते तुमच्यासाठी अधिक उत्तम व चांगले आहे , आणि असें करणे तुमच्या काही वाईट दोष या वर्तनाने नाहीसे होतात, आणि जे काही काम तुम्ही करता अल्लाहाला सर्व परिस्थितीत ज्ञान आहे.( सूरहा अल-बकरा आ.नं.२७१ ), अशा गरजु लोकांना मदत करा दान दया की ज्यांनी अल्लाहाच्या कार्यात मार्गात स्वतःला गुंतवून वाहून टाकले आहेत, की त्यामुळे ते स्वतःच्या उपजीविकेसाठी जमिनीवर काही धावपळ करू शकत नाहीत , ते याचना करण्यापासून ( मागणी )स्वतः ला दूर ठेवतात, त्यांच्या स्वाभिमानाकडे पाहून आज्ञानी मनुष्य समजतो की ; हे सुस्थितीत आहेत , परंतु , तुम्ही त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांची अंतरिक परिस्थिती ओळखू शकत नाही, मात्र ते लोक असे नाही की, ते लोकांच्या पाठीशी लागून काही मागतील, त्यांच्या अर्थसह्यासाठी जी काही संपत्ती तुम्ही खर्च कराल ती अल्लाहा पासून लपवून ( दडवून) राहणार नाही, अल्लाह सर्व काही जाणतोच आहे '' ( सुराह अल-बकराह अ.नं.२७३ ), पवित्र रमजान महिन्यातील सर्वात मोठे सबाब (पुण्यं) , ''(१) सदकाहा, '(२) - फितत्राह,' व (३)' '' जकात '' देणे. ज्या लोकांवर जकात देणे अनिवार्य ( फर्ज )केलेलं आहे त्या सर्व लोकांवर, '' सदकाहा '' व '' फितत्राह ' हें अनिवार्य आहेत.जकात बद्दल कालच्याच २३ व्या लेखात माहिती घेतली.. सदकाहा :- याला काहीच बेरीज वजावाकी करावी लागत नाही, घरात कोणी आजारी पडलं, नवीन काही खरेदी करावयाची, कोणतेही शुभ कार्य करायचं किंवा तुम्हीं प्रवासाला निघायचं आहेत तर एक अशा चांगल्या कामाची सुरुवात हीं दान देऊन केली जाते.. '' फित्राह '' हें फक्त रमजान महिन्या पुरतं मर्यादित आहेत.. संपूर्ण रमजान महिना विविध पुण्य कर्म करून त्याचा शेवट हा सुद्धा पुण्य कर्माने व्हावं कोणताही वंचित, गरजु, गरीब अनाथ, विधवा, मजुर, उपाशी राहणार नाहीत, ईद च्या आनंदा पासून वंचित राहणार नाहीत फक्त याच उद्देशा प्रति फित्राह दान करणं हें पैगंबर मुहम्मद स्व नीं कळकळीनं सांगितलं. प्रेषित मुहम्मद स्व.म्हणतात की , ''सदकाह - फितत्राह तुम्ही ईदच्या नमाज अदा करण्याच्या अगोदर लवकरात लवकर द्यावेत. '' गरीब - दारिद्र्यरेषेखालील लोक ईदचा उत्सव आनंद मुलाबाळांसह साजरा करुन ईदच्या आनंदात सामील होऊन ईदच्या आनंदापासून परावृत्त राहणार नाही.घरातील जेवढे मंडळी असतील व जर घरात एखादी मुलगी सून पत्नी कोणीही गर्भवती असेल तर त्या गर्भातील बाळाचे हीं, प्रत्येकी २.५ किलो ग्राम (अडीच किलो) प्रमाणे गहू किंवा त्यांची किंमत किंवा तुमच्या ऐपतीप्रमाणे जवस, तांदूळ, किसमिस,.मनुका ई. जीवणोपयोगी दैनंदिन जीवनातील गरजेच्या दोन वेळचे अन्नधान्य .प्रेषित मुहम्मद स्व.यांनी सांगतात, '' गरिबांची मुले आजूबाजूच्या घरांमध्ये जावुन ईद साजरी होतांना बघून दुखी होतील, त्यांचं मन दुखेल ते दुःखी होतील म्हणूनच ''ईदुल फित्र '' ची नमाज आदा करण्याच्या जितक्या लवकरात लवकर फितरा- सदकाह- दान देता येईल तेवढे द्यावे ''.पैगंबर मुहम्मद स्व. वारंवार सांगतात की , सदकाह फितत्राह हे दान ईदुल फित्रच्या ईदगाहा जाण्याच्या अगोदर देणे हें फार पुण्यांच (सबाब) काम आहे '' ते तुम्ही ४/५ दिवस अगोदरच सदकाह - ,फितत्राह आणि तुम्ही जे काही दान द्याल त्याचं ते बाजारात जाऊन त्याचे पैसे करून कुटुंबासाठी काहीतरी गरजेनुसार खरेदी करून आणू शकतील, मुलाबाळांबरोबर ईद साजरी करू शकतील.

काहींनी पैगंबर मुहम्मद स्व यांना प्रश्न विचारलं की , '' दान दिले तर आमच्या प्रॉपर्टीतुन कमी होईल,'' वरील प्रश्नाचे उत्तर प्रेषित मुहम्मद स्व.नीं दिलें की,'' सदकाहा - फितत्रह - जकात दिल्याने तुमचा माल ,पैसा,कधीच कमी होत नसतो. ऐका - !! जेव्हा दान देणारा देत असतो, तर घेणाऱ्याच्या हातात दान देण्याअगोदर तो सदकाह- जकात अल्लाहच्या हातात अगोदर पोहोचलेला असतो !!! त्याचं सबाब (पुण्यं) कैकपटीने तुम्हाला आगोदर मिळते'' ( हादिस तबराणी नं .११९८२ अन.अब्बास रजि. ). प्रेषीत मुहम्मद स्व. प्रिय पत्नीला सांगतात,'' ये आयेशा (रजि.) तुम्ही नम्र व्हा, संयम बाळगुण सदकाह व फितराह देत राहा. कोणतेही दान - एका हाताने दिले तर त्याची खबर दुसऱ्या हातास लागता कामा नयेत ! जेवढ्या गुप्तपणे - गुपचूप द्याल तर त्याचं सबाब (पुण्य) तुम्हाला किती तरी पटीने जास्तच मिळेल. '' दिव्य कुरआन म्हणतो की'' जर तुम्ही आपले दान जाहीररीत्या द्याल तर हे देखील चांगले आहेत, परंतु जर गुप्त रित्या गरजूंना द्याल तर हे तुमच्यासाठी अधिक उत्तम आहे. त्यामुळे तुमचे बरेसचे दोष या वर्तनाने नाहीसे होतात ''(सुराह अल-बकरा नंबर अ.नं.२७१ )., काही गरीब हे मांगून घेणारे असतात, काही गरीब स्वाभिमानी असतात, त्यांची ती मजबुरी असते,त्यामुळे ते काही काम वगैरे करू शकत नाही व भिकही शरमेमुळे मागु शकत नाही. असे स्वाभिमानीं लोक स्वतः त्रास सहन करतात, त्यांना त्यांची प्रतिष्ठा महत्त्वाची असते.म्हणून हजरत प्रेषित मुहम्मद स्व. म्हणतात , त्यांचीही प्रतिष्ठा टिकली पाहिजे, म्हणून अशा स्वाभिमानी असलेल्या मात्र परिस्थिती नुसार लाचार - गरीबांना त्यांच्या स्वाभिमाना खातर अंधारात गुपचुप मदत द्या व भरपूर सबाब (पुण्यं) प्राप्त करा.जवळचे काही नातेवाईक ही गरीब असतात, प्रेषित मुहम्मद स्व. म्हणतात, गरिबाला देण्याचं प्राधान्य तर आहेतच, परंतु सर्वात महत्वाचं जवळचे नातेवाईक गरीब असतील तर पहिल्या प्रथम तुमच्यावर जास्त हक्क त्यांचा असतो, आपल्या गरीब नातेवाईकांना द्या, नातेवाईक आपल्या नातेवाइकांना सदकाह- फितराह- जकात मागत नसतात, त्यांनाही स्वाभिमान, अस्मिता असतात . त्यामुळे तुम्हाला दुहेरी सबाब (पुण्यं) भेटते, तुम्हाला तुमचा सदकाह दिला म्हणून पाहिलं सबाब तर दुसरं तुमच्या नातेवाईकाबरोबर सद- व्यवहार केला म्हणून, तिसरं विशेष म्हणजे त्यांना तुम्ही जवळ करून घेतले म्हणून ''.( हादिस :- मुस्तदरक १४७६ ). नातेवाईकांना सदकाह मागणी करणे म्हणजे कमीपणाचे वाटतात, उपाशी राहतील मात्र मागणार नाहीत, स्वतःहून पुढाकार घेऊन त्यांचे सर्व प्रश्न सोडवून त्यांना जवळ घेऊन मदत केली तर त्यांच्याबरोबरच आपले संबंध सुरळीत होतील. म्हणूनच प्रेषितांनी सांगितले की आपल्या जवळच्या नातेवाईकांबरोबर चांगला व्यवहार करण्याचे वेळोवेळी सांगितले आहेत . सदका वंचित,पीडित,अनाथ, गरीब गरजु -गोरगरिबांचे वर्षभराची अर्थव्यवस्था आहे, त्यावरच त्यांचा प्रपंच चालतो, म्हणून वारंवार सदकाह देत चला . सदकाह वर्षे भर देण्याची गरज आहे. दान दिल्याने ते वाढतच असतं.



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## एचपीव्ही लस आपल्या मुलींना द्या : स्नेहल खोरे



**श्रीरामपूर** : आपल्या मुलींचे आयुष्य सुरक्षित करण्यासाठी एचपीची लस उपयुक्त ठरणार असून कॅन्सरसारख्या भयंकर आजारापासून मुलींना संरक्षण देण्यासाठी ही लस घ्यावी असे प्रतिपादन श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी केले आहे. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसबाबत बोलताना स्नेहल खोरे म्हणाल्या की, या लसबाबत नागरिकांकडून जनजागृती होणे गरजेचे आहे. अनेक नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरवली गेल्याने ही लस घेण्याची टाळाटाळ केली जात आहे. मात्र आपण स्वतः आपली मुलगी शौर्यजा हिला ही एचपीव्ही लस दिली असून त्यामुळे कर्करोगापासून बचाव होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.रविना सांगळे, आशासेविका नीता सातदिवे, वैशाली पवार, मंगल पातोरे, रेणुका गायकवाड आदींसह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## पोलीस दलातील कुस्तीपटू पोलीस हवालदार दादू गायकवाड यांचे निधन



**नेवासा** : एकेकाळी नेवासा पोलीस स्टेशनला उत्कृष्ट कामगिरी करणारे शेवगांव तालुक्यातील ताजनापूर येथील रहिवासी असलेले पोलीस दलातील कुस्तीपटू सेवानिवृत्त पोलीस हवालदार दादू रंभाजी गायकवाड (वय ६१) यांचे नुकतेच निधन झाले.त्यांच्या पच्यात पत्नी,दोन मुले,मुलगी,सुना, नातवंडे,जावई असा मोठा परिवार आहे. त्यांनी शिर्डी,नेवासा,पाथर्डी आणि तिसगाव माहामार्ग वाहतूक शाखेत काम केलेले होते ते उत्कृष्ट कुस्तीपट्टू म्हणून ते जिल्ह्यात सुपरिचित होते. नेवासा पोलीस ठाण्याचे वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार किरण गायकवाड आणि पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुहास गायकवाड यांचे ते वडील होत.

## भोंदू बाबांच्या फसवणुकीविरोधात अंनिसचे आवाहन

**बेलापूर** : देव-धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेत दैवी शक्तीच्या आधारे विविध आजार बरे करण्याचे खोटे आश्वासन देऊन आर्थिक, शारीरिक व मानसिक फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबा-बुवांविरोधात तक्रार करण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे देविदास देसाई यांनी केले आहे. अशा प्रकारे भोंदूगिरी करून भोळ्या नागरिकांना लुबाडणाऱ्या तथाकथित बाबांच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. महाराष्ट्र शासनाने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू केला असला तरी श्रीरामपूर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भोंदूगिरी सुरू असल्याचे देसाई यांनी सांगितले. भूतबाधा, जादूटोणा, करणी काढणे यांसारख्या नावाखाली अनेक ठिकाणी लोकांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. या बाबांकडे जाणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त असून त्याचा गैरफायदा घेत काही ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या तक्रारी समितीकडे आल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यात पसरलेल्या या भोंदूगिरीचा अंनिसच्या वतीने भांडाफोड करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून फसवणूक झालेल्या नागरिकांनी देविदास देसाई, बेलापूर (ता. श्रीरामपूर) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारदारांचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असेही देसाई यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अंनिसच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत कारवाईची मागणी करण्यात येणार आहे. तसेच लवकरच श्रीरामपूर तालुका अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येणार असून अंधश्रद्धाविरोधी कामात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी समितीशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# वाळू लिलावाविरोधात रामपूर ग्रामस्थांचा एल्गार

## उपोषणाचा पाचवा दिवस-प्रशासनाकडून अद्याप दखल नाही

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नाऊर** : श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर येथील गोदावरी नदीपात्रातील वाळूघाटाचा लिलाव झाल्यास, गावासह परिसरातील शेती उध्वस्त होऊन परिणामी नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून नाऊर, रामपूर, सावखेडगंगा, ढोक नांदुर, लाडगाव परिसरातील शेतीला मिळणारे पाण्याचे संकट येऊन २५०० ते ३००० पशुपालक शेतकरी आणि हजारो हेक्टर बागायती क्षेत्रालाही याचा फटका बसू शकतो, ग्रामसभेनेही लिलाव प्रक्रियेला एकमताने विरोध दर्शवला होता. प्रशासनाने ही प्रक्रिया त्वरीत थांबवावी, अशी मागणी रामपूर ग्रामस्थांनी करत दि. १० मार्चपासून आमरण उपोषण सुरु केले असून आज उपोषणाचा ५ वा दिवस असुन महसूल सह प्रशासनाच्या अधिकारी यांनी अद्याप कुठलीही दखल घेतलेली दिसत नाही.

श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर( कोकरे ) येथील गट नंबर ७०, ७१, ७३ आणि ७८ मधील गोदावरी नदीच्या वाळूघाटाच्या लिलावाविरोधात सरपंच, उपसरपंच,सदस्य आणि सर्व ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. या परिसरात वाळू लिलाव होऊ नये या मागणीसाठी ग्रामस्थांनी दि. २५ जुलै २०२५ रोजी उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पत्राद्वारे कळविले होते. परंतु, रामपूर येथील जनतेच्या भविष्यातील पाणीप्रश्नाचा विचार न करता दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी महा ई-टेंडर वेबसाईटवर याबाबत टेंडर प्रक्रिया प्रसिद्ध झाली आहे. ही टेंडर प्रक्रिया झाल्यास रामपूर गावासह परिसरातील पाणीपुरवठा वर मोठा परिणाम होऊन, शेतीसह शेतमजुर, पशुपालक यांना भविष्यातील टंचाई खडकाळ वाळवंट होण्याची शक्यता आहे.

नदीतील वाळूचा बेसुमार उपसा करून परिसराची एकाप्रकारे 'वाट लागणार असून हा गोदावरी नदीचा परिसर सुजलाम-सुफलाम आहे नदीमधील वाळूच्या साठ्यामुळे या परिसरात पाण्याची पातळी टिकून राहते, पाणी टिकले तर अनेकांची उपजिविका त्याच्यावर चालत असते. परंतू शासनाच्या विरोधी धोरणामुळे आमचं गाव वगळता इतर ठिकाणचा नदीपात्रातील वाळूचा मोठ्या प्रमाणावर उपसा सुरु झाला आहे. त्यामुळे नदीकाठची अनेक गावे भकास झाली आहे, त्यामुळे वाळूला पर्याय असुन तो शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. गावामध्ये दूध उत्पादनावर उदरनिर्वाह करणारे सुमारे हजारो शेतकरी असून, गुरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी भविष्यात भटकंती होऊ शकते.

तसेच, आमच्या एका गावामध्ये २७५ हेक्टर क्षेत्र बागायती असून, नाऊर सावखेड,लाडगाव आदी गावातील हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आहे. मात्र लिलाव झाल्यास शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यामुळे लिलाव प्रक्रिया होऊ नये, या मागणीसाठी सर्व ग्रामस्थांनी तातडीची ग्रामसभा घेऊन एकमताने ठराव पारित करून सर्व ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत रामपूर यांच्या वतीने हनुमान मंदिर रामपूर येथे आमरण उपोषण सुरु करण्यात आले असून उपोषणाचा आजचा ५ वा दिवस आहे.

### महंत रामगिरी महाराज यांना रामपूरकरांचे साकडे

गोदावरी धाम सराला बेटाचे मठाधिपती रामगिरी महाराज यांनी ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सराला बेट येथे आयोजित किर्तनामध्ये रामपूर ग्रामस्थ व नाऊर ग्रामस्थांचे कौतुक करत आत्तापर्यंत वाळूचा एकही खडा आपल्या परिसरात उचलून न दिल्याबद्दल विशेष अभिनंदन करत सर्व शेतकऱ्यांनी एकजुटीने रामपूर ग्रामस्थांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करत शेती टिकली तर परिसर टिकेल, वाळूला पर्याय आला असून मोठ -मोठी समृद्धी रस्त्याची कामे डस्ट वापरून करण्यात आली. त्यामुळे प्रशासनाने लिलाव प्रक्रिया थांबून पर्यायी डस्टचा वापर करण्याचे आवाहन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

## भीमजयंती उत्सव २०२५ निमित्ताने विविध स्पर्धा संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : विश्वभूषण, भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर युथ फाउंडेशन व सक्षम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा (डॉ. आंबेडकर जीवन प्रवास, जातीय व्यवस्था, शिक्षणाचे फायदे), निबंध स्पर्धा (डॉ. आंबेडकरांचे जीवनचरित्र, शिक्षण आणि परिवर्तन, भारतीय राज्यघटनेचे महत्त्व) आणि चित्रकला स्पर्धा (डॉ. आंबेडकर यांचे व्यक्तिचित्र, शाळेत जाणारी मुले, माझे शहर, स्वच्छ शहर) या विषयांवर स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी शहरातील ४० विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन स्पर्धेचा आनंद घेतला. या उपक्रमाला महामानव विचार प्रबोधन समिती, प्रसिद्ध चित्रकार रवी भागवत व रंगलहरी आर्ट अकॅडमी यांचे विशेष सहकार्य लाभले. स्पर्धेचे परीक्षण अशोक दिवे, रमेश मकासरे, सुरेंद्र साळवे आणि एन. डी. साळवे यांनी केले. यावेळी सक्षम फाऊंडेशनचे सुशील पठारे, सिद्धार्थनगर युथ फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बाबा मिसाळ, सचिन खंडागळे, अमोलकुमार मिसाळ, विशाल खंडागळे, आकाश पंडित, सोन्या शेळके, आशिष पेटारे, कोरो इंडियाच्या सोनम धीवर, अमोल सोनवणे, आयुष्मान तायड, करण ठोंबरे, सामाजिक कार्यकर्ते बंडूकुमार शिंदे, अंतोन शेळके, रितेश एडके, रमेश शिनगारे, संपत मोरे, सी. एस. बनकर यांच्यासह इतर पालक व नागरिक उपस्थित होते. १२ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाणार आहे.

## सुरत-चेन्नई महामार्गग्रस्त शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा मुद्द्यावर अधिवेशनात आ. खताळ यांनी वेधले लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : मुंबई येथे सुरू असलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संगमनेर मतदारसंघातील सुरत-चेन्नई महामार्ग प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा मोबदल्याचा प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी सभागृहात उपस्थित केला. या प्रकल्पासाठी जमीन नोंदवून घेण्यात आलेल्या अनेक शेतकऱ्यांना अद्याप योग्य मोबदला मिळालेला नसल्याने शासनाने तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार खताळ यांनी सांगितले की, सुरत-चेन्नई महामार्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून सन २०२१ मध्ये संगमनेर मतदारसंघातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींच्या उताऱ्यावर थेट नोंदी करण्यात आल्या. त्यामुळे संबंधित जमिनी प्रकल्पासाठी निश्चित झाल्या. मात्र तीन वर्षांहून अधिक कालावधी लोटूनही अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनींचा योग्य मोबदला मिळालेला नाही. या परिस्थितीमुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या कुटुंबांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. जमीन नोंद झाल्यानंतरही वेळेवर मोबदला न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुरत-चेन्नई महामार्ग हा राज्यातील महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प मानला जात असला तरी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य व वेळेवर भरपाई मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर योग्य मोबदला देण्याची कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी आमदार खताळ यांनी अधिवेशनात केली.

## गुरूवर्य नारायणगिरी महाराज सर्व सकल समाजाचे गुरू : अरूणनाथगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**माळवाडगांव** : गुरूवर्य नारायणगिरी महाराज हे केवळ अरूणनाथगिरी महाराज यांचेच गुरू नव्हते तर सर्व सकल समाजाचे गुरू होते.

आपण श्रीक्षेत्र सराला बेटावर विद्यार्थीदशेतील बालपण अशा सदगुरूच्या सानिध्यात घातल्याने आपणासमोर त्यांच्या कितीही आठवणी सांगितल्या तर संपता संपणार नसल्याचे प्रतिपादन श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांनी सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी कार्यक्रमात भाविकासमोर उपदेश करताना केले. श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथे गुरूवर्य सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला.

सकाळी ९ वाजता अभिषेक पुजन आरती संपन्न झाली. ११ वाजता मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांनी सत्संग प्रवचनातून भाविकासमोर गुरूवर्य नारायणगिरी महाराज यांच्या सानिध्यातील आठवणींना उजाळा देताना महाराज पुढे म्हणाले की, कोरोना साथीनं तर देवस्थानवर बाबांची पुण्यातिथी सोहळा बंद केला होता. कारण श्रीक्षेत्र सराला बेटावर समाधीस्थळी भव्यतेत सोहळा होतो म्हणून इथं नको. परंतू बाबा अडबंनाथ देवस्थानवर येत होते म्हणून या वर्षापासून पुण्यातिथी सोहळा घेण्याची प्रेरणा झाली. आता पुढील वर्षापासून मोठ्या उत्साहात भाविकांच्या गर्दीने फुलून जाणारा सोहळा पुण्यातिथी सोहळा इथं होईल.

सद्गुरू नारायणगिरी महाराज हे कलीयुगातील भक्तांची चालती बोलती आई , परमेश्वर,जगाचे मालक होते. केले उपकार सांगू मी काय? बाप न करी ऐसे माय! माझ्यासारख्या पामराला गुरूवर्य बाबा भेटले नसते तर आज आम्ही जन्मगावी शेतात पाणी भरत असतो. आज जे घडलो आहे तुमच्यासमोर दिसतो ते केवळ गुरूवर्य नारायणगिरी महाराज यांच्यामुळेच. गुरूवर्यांच्या सानिध्यातील अनेक प्रत्यक्षात घडलेले अनेक उदाहरणे भाविकासमोर मांडताना महाराज भावूक झाले होते.

## टाकळीमिया रेल्वे बोगद्याजवळ अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला !

### ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन !!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील रेल्वे बोगद्या जवळ एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याची घटना समोर आली आहे. या मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी राहुरी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत टाकळीमिया शिवारातील रस्त्यालगत असलेल्या देवळाच्या परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला.

ही घटना ११ मार्च २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ८.५० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. संबंधित इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. मृत इसमाचे वर्णन मध्यम बांधा, दाढी-मिशा असलेला असा असून त्याच्या नाव- पत्त्या बाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करत आहे. दरम्यान, या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी राहुरी पोलीस ठाण्याने नागरिकांना आवाहन केले आहे. संबंधित व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा ओळख पटल्यास तात्काळ राहुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.


**WALK-IN-INTERVIEW**

Greenworld Foundation's

**Arya Senior College, Manjari**

At. Po. Manjari, Tal. Rahuri, Dist. Ahilyanagar Pin-413705 [Permanent Non-Grant]

**Affiliated to Savitribai Phule Pune University**

Our Institution is inviting Applications from the eligible candidates for the following purely Temporary posts (Non-Grant) for the Academic Year 2025-2026.

| Sr. No | Post Posts | Subject | No.of | Reservation | Qualification |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | -- | 01 | -- | MA/M.Com./M.Sc., SET, NET, Ph.D. 15 years Approved Experience |
| 2 | Asst. Professor | Chemistry | 02 | 01 SC, 01 (Open to All) | M.Sc., SET/NET/Ph.D. |
| 3 | Asst. Professor | Physics | 02 | 01 SC, 01 (Open to All) | M.Sc., SET/NET/Ph.D. |
| 4 | Asst. Professor | Zoology | 02 | 01 SC, 01 (Open to All) | M.Sc., SET/NET/Ph.D. |
| 5 | Asst. Professor | Botany | 02 | 01 SC, 01 (Open to All) | M.Sc., SET/NET/Ph.D. |
| 6 | Asst. Professor | Commerce | 01 | 01 (Open to All) | M.Com., SET/NET/Ph.D. |
| 7 | Asst. Professor | Economics | 01 | 01 (Open to All) | M.A., SET/NET/Ph.D. |
| 8 | Asst. Professor | Marathi | 01 | 01 (Open to All) | M.A., SET/NET/Ph.D. |
| 9 | Asst. Professor | English | 01 | 01 (Open to All) | M.A., SET/NET/Ph.D. |
| 10 | Librarian | -- | 01 | 01 (Open to All) | M. Lib. SET/NET |
| 11 | Physical Director | -- | 01 | 01 (Open to All) | M. P.Ed. SET/NET |
| 12 | Clerk | -- | 02 | -- | U.G/P.G. Degree (any faculty). M.S.CIT. & Typing Mar 30wpm, Eng. 40wpm |
| 13 | Accountant | -- | 02 | -- | U.G/P.G. Degree (any faculty). M.S.CIT. & Typing Mar 30wpm, Eng. 40wpm |

**Date & Time of interview: Sunday, 22th March 2026 10:30 a.m.**
**Place of interview:**
**Arya Senior College, Manjari, At. Manjari, Tal. Rahuri, Dist. A.Nagar Pin-413705**
**Contact Details: 9503784469, 9850350535, 7057457223**
**E-mail.: aryasenior23@gmail.com**

1. Qualification, pay-scale and service conditions for all these posts are as prescribed by UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University recently and time to time. 2. At the time of interview, candidate should bring application, resume and all original testimonials and Xerox copies of the documents. 3. No T.A./D.A. will be paid to any candidate appearing for the interview.

**Secretary**
Greenworld Foundation At. Khedale parmanand,
Post. Shriregoan Tal. Newasa, Dist. Ahilyanagar, Pin 414105

**Chairman**
Greenworld Foundation At. Khedale parmanand,
Post. Shriregoan Tal. Newasa, Dist. Ahilyanagar, Pin 414105


## जिंकलो नाही तरी पाडण्याची ताकद आमच्यात आहे : डॉ. राजेंद्र गवई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील आगामी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आर.पी.आय. (गवई गट) यांची महत्त्वपूर्ण बैठक राहुरी येथे पार पडली. याचवेळी स्वातंत्र्य सैनिक गोपीनाथ वाघमारे बहुउद्देशीय संस्था, खळी यांच्या वतीने राहुरी तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान सोहळाही आयोजित करण्यात आला.

आत्मा मलिक हॉटेल येथे झालेल्या या कार्यक्रमात मतदारसंघातील राजकीय घडामोडी, आगामी निवडणूक रणनीती, संघटन मजबुतीकरण तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र गवई यांनी सांगितले की, सध्या पक्ष महाविकास आघाडीसोबत आहे. मात्र भविष्यात पक्षाचा योग्य विचार झाला नाही तर राहुरी-नगर-पाथर्डी पोटनिवडणूक स्वतंत्रपणे लढविण्याचा पर्याय खुला आहे.

आम्ही निवडून आलो नाही तरी मोठ्या उमेदवाराला पराभूत करण्याची ताकद आमच्यात निश्चित आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर, जनसंपर्क वाढविण्यावर तसेच बूथ कमिटी सशक्त करण्यावर भर देण्यात आला. आगामी निवडणुकीसाठी प्रचार मोहीम, स्थानिक प्रश्नांवरील भूमिका आणि सामाजिक ऐक्य याबाबतही चर्चा झाली. या वेळी राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई, सुधाकर रोहम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र घायवट, उत्तर महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार किशोरजी वाघमारे, मायाताई वाघमारे, योगेंद्र गायकवाड, सुशांत म्हस्के, उत्तम साळवे, सारिका गांगुर्डे, मोनाली गुंजाळ, हर्षद साळवे, बाबासाहेब भांड यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते. दरम्यान, पत्रकार दिनानिमित्त उपस्थित पत्रकारांना प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारांनी समाजासाठी केलेल्या कार्याचे यावेळी मान्यवरांनी कौतुक केले.

# विजेच्या गलथान कारभाराविरोधात काँग्रेसचे ठिय्या

## पाणीपुरवठा योजनांचे तोडलेले वीज कनेक्शन तातडीने सुरू करा : डॉ. जयश्रीताई थोरात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : तालुक्यातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने मिळणारी वीज तसेच ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांची तोडलेली वीज कनेक्शन याविरोधात संगमनेर शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. युवक काँग्रेस अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

सध्या राज्यभरात उन्हाची तीव्रता वाढली असून शेतकऱ्यांच्या पिकांना पाण्याची मोठी गरज आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना अत्यंत कमी दाबाने व अवेळी वीजपुरवठा होत असल्याने शेतीकामे अडचणीत आली आहेत. याशिवाय शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असताना अनेक ठिकाणी वारंवार वीज खंडित होत असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे.

दरम्यान, गावोगावी असलेल्या पाणीपुरवठा योजनांची वीज कनेक्शन तोडल्यामुळे अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून महिलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे, असे डॉ. जयश्रीताई थोरात यांनी सांगितले. गुंजाळवाडी, वडगाव पान, समनापुर, खांडगाव आदी गावांमधील पाणीपुरवठा योजनांची वीज कनेक्शन बंद असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने या योजनांचे वीज कनेक्शन सुरू करून नियमित व सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या वेळी अजय फटांगरे, नवनाथ आरगडे, पद्माताई थोरात, प्रमिला अभंग, योगिता सातपुते, प्रदीप हासे, राजू खरात, प्रवीण गायकवाड, बाळासाहेब वाळके, रोहिणीताई गुंजाळ, नानासाहेब दिघे, किरण खुळे, सचिन गोरडे, तात्या कुटे, भास्कर शर्माळे, राजू गुंजाळ, दिगंबर इंगळे, भाऊसाहेब दिघे, प्रा. सत्यजित थोरात, शेखर सोसे, शिवाजी गुंजाळ, दत्तात्रय खुळे, संजय कुटे, योगेश पोकळे यांच्यासह सुमारे १०० कार्यकर्ते उपस्थित होते.आंदोलनादरम्यान शेतकरी व नागरिकांनी वीजपुरवठ्याशी संबंधित विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

यानंतर महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार यांनी एक ते दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.


अ‍ॅड. आर. एम. मुंगसे
मो.नं.९८९०७४८७७२
नेवासा कोर्ट ता. नेवासा,
जि. अहिल्यानगर
दि.१३/३/२०२६

**जाहीर प्रगटन**

तमाम लोकांना विशेषतः मौजे नेवासा तालुक्यातील लोकांना या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल लिलाबाई दादा हिवाळे यांचे नावावर असलेली शेतजमिन मिळकत मौजे देडगाव, ता. नेवासा येथील गट नंबर २८३/३ पैकी क्षेत्र ०१ हे. ६२ आर या मिळकती बाबत ज्ञानदेव बापुसाहेब कुऱ्हाट व बेबीताई ज्ञानदेव कुऱ्हाट यांनी दि. ६/७/२०१२ रोजी दस्त क्रं. ३०२०/२०१२, ३०२१/२०१२, ३०२३/२०१२ अन्वये करुन घेतलेले बिन कब्जाचे साठेखत, जनरल मुखत्यार पत्र व मृत्युपत्र हे आमचे आशिलास फसवून करुन घेतलेले असल्यामुळे ते आमचे आशिलाने योग्यरित्या रद्द केलेले आहे व त्या दस्ताचा कोणत्याही प्रकारचा त्यांचेसोबत व त्या दस्तावरुन दुरुपयोग होईल असे कोणतेही कृत्य करु नये.

हे जाहीर प्रगटन दिले असे.

नेवासा
दि.१३/३/२०२६

**जाहिर प्रगटन देणार**
**जाहीर प्रगटन देणार तर्फे अ‍ॅडव्होकेट**
**(अ‍ॅड. आर. एम. मुंगसे)**

## पान १ वरुन

### बळजबरीने धर्मांतर केल्यास १० वर्षांचा तुरुंगवास

आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीची असेल, तर ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल. ३) पुनरावृत्ती केल्यास १० वर्षे कोठडी : ज्यांनी यापूर्वी असा गुन्हा केला आहे आणि ते पुन्हा दोषी आढळले, तर त्यांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ७ लाख रुपये दंडाची शिक्षा होईल. ४) संस्थांची नोंदणी रद्द होणार : जर एखाद्या संस्थेने (उदा. एनजीओ, अनाथाश्रम, रुग्णालय) बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणले, तर त्या संस्थेची नोंदणी रद्द केली जाईल आणि संबंधितांना ५ लाख रुपये दंड व ७ वर्षे कारावास भोगावा लागेल.

### वाळूतस्कर, गौण खनिज माफियांवर कारवाई करा

शकत नाही. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना अनेकदा कारवाई करतांना पोलिसांची मदत लागते. यामुळे महसूल विभागाला पोलीस प्रशासनाच्या भक्कम पाठबळाची गरज आहे. जर पोलीस प्रशासन आणि महसूल विभाग यांनी संयुक्तपणे मोहीम राबवली तर ही कारवाई अधिक गतीने आणि प्रभावीपणे होऊ शकेल. जोपर्यंत पोलीस बळ या कारवाईत पूर्ण ताकदीने उतरत नाही तोपर्यंत अवैध गौण खनिज उपसा कायमस्वरूपी थांबणार नाही. त्यामुळे गृह विभाग आणि महसूल विभागाने समन्वयाने काम करून अवैध अवैध गौण खनिज उपसा करणाऱ्यांना कायमचा लगाम घालावा अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी विधिमंडळात केली आहे.

### दरडगावात महिलेचा घरात गळफास

घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. परंतू वेळीच उपचार मिळाल्यामुळे त्यावेळी त्यांचा जीव वाचला. दि. १३ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजे दरम्यान जया हारदे ह्या त्यांच्या राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. परिसरातील नागरिकांनी त्यांना ताबडतोब राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. वैद्यकीय अधिकारी प्रवीण शिरसागर यांनी उपचारा पूर्वीच त्यांना मयत घोषित केले.

यावेळी मयत जया हारदे यांची मुलगी व मुलाने सांगीतले कि, शेतीच्या कारणावरुन जया हारदे यांचा सासरच्या लोकांकडून छळ सुरु होता. रावसाहेब रभाजी हारदे, मच्छिंद्र रावसाहेब हारदे, कल्पना मच्छिंद्र हारदे, लक्ष्मी रावसाहेब हारदे, सर्व रा. दरडगाव, ता. राहुरी. या चार जणांनी मयत जया हारदे यांना शारीरिक व मानसिक त्रास दिला. त्यांच्या त्रासाला कंटाळून जया हारदे यांनी आत्महत्या केली. किंवा सासरच्या लोकांनी त्यांना मारुन टाकले असावे. असा संशय व्यक्त करण्यात आला. जया हारदे यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी आणि आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी मयत जया हारदे यांच्या नातेवाईकांनी केली.

या घटने बाबत दरडगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुरी पोलिस ठाण्यात दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

### एआय, डिजिटल सुविधा, योजणांमुळे महाराष्ट्रातील शेती सक्षम होणार : कृषीमंत्री भरणे

करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शेततळे, प्लास्टिक अस्तरीकरण, यंत्र ड्रोनच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की कृषी विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी महाडीबीटी प्रणालीद्वारे करण्यात येत असून २०२० पासून आतापर्यंत शेतकऱ्यांना ७ हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक अनुदान वितरित करण्यात आले आहे. यावर्षी महाडीबीटी पोर्टलद्वारे तब्बल ५० लाखांहून अधिक अर्जांची निवड करण्यात आली असून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या पद्धतीने लाभार्थी निवड करण्यात येत आहे. कृषीमंत्री भरणे म्हणाले की राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून मागील नऊ वर्षांत शेतकऱ्यांना ३७ हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्य सरकारने एक कोटीहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे १५ हजार ६६१ कोटी रुपयांची मदत वितरित केली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

भरणे म्हणाले की याशिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महा सन्मान निधी अशा विविध योजनांद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक आधार दिला जात आहे. पीएम किसान आणि नमो शेतकरी योजनेअंतर्गत आतापर्यंत ५२ हजार ३१६ कोटी रुपयांची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या ॲग्रीस्टॅक प्रकल्पाअंतर्गत राज्यात शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्याचे कामही वेगाने सुरू असून आतापर्यंत १ कोटी ३१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले आहे.

### अटी पूर्ण केल्यासच गुंठेवारी प्रस्तावांना मंजुरी- मंत्री डॉ. उदय सामंत

विमानतळाच्या फनेल झोनमध्ये बांधकाम झालेले असणे या कारणाचा समावेश आहे. या कारणांमुळे काही प्रस्तावांना मंजुरी देता आलेली नाही. फनेल झोनमधील घरांना आयकरामध्ये सवलत देण, घरांना परवानगी देण आणि संरक्षण मंत्रालयाची परवानगी मिळवण हे राज्य शासनाच्या अंतर्गत येत नाही. गुंठेवारी नियमित व्हावी याबाबत शासन सकारात्मक असले तरी कोणतेही शुल्क न घेता सर्व बांधकामे नियमित केल्यास महानगरपालिकेचा महसूल कमी होईल, असेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

# थकबाकीमुळे श्रीरामपूरातील बीफ मार्केट, पापा जलाल मार्केटचे ४ गाळे सील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** :श्रीरामपूर नगरपरिषद क्षेत्रातील वार्ड न.२ येथील नगरपरीषदेकडून थकबाकी रक्कमपोटी दुकान गाळा व बीफ मार्केट तसेच पापा जलाल मार्केट येथील ४ गाळेधारकांना गाळे सील करण्याची कडक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी दिली.



श्रीरामपूर नगरपरिषद क्षेत्रातील वार्ड न.२ येथील बीफ मार्केट व पापा जलाल मार्केट येथील ४ गाळेधारकांना वारंवार भेटी व नोटीस, दूरध्वनी संपर्क, अधिपत्र देउन सुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे श्रीरामपूर मुख्याधिकारी यांचे निर्देशानुसार कर विभाग मार्फत कराचा भरणा रू १०,९०,०००/- या थकबाकी रकमेचा भरणा न केल्यामुळे दि.१३ मार्च २०२६ रोजी गाळे सीलची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच वार्ड क्र.२ मधील मालमत्ताधारकांचे ४ नळ कनेक्शन देखील खंडीत करणेत आले आहे, तरी शहरातील सर्व नळ कनेक्शनधारक व मालमत्ताधारक यांनी लवकरात लवकर कर भरणा करून नगरपालिकेस सहकार्य करावे व होणारी कटू कारवाई टाळावी.

सदरच्या कारवाईच्या वेळेस श्रीरामपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी महेंद्र ताकपिरे, वसूल विभाग कर विभाग प्रमुख विकास घटकांबळे, कर निरीक्षक सुभाष बाचकर , वार्ड लिपिक गणेश गवळी, अरुण तुपे, योगेश प्रधान, ईश्वर शेळके, नितीन पवार, अमोल गायकवाड, रोहित भांबरे, राजेश थोरात, विशाल चौधरी, शंभू छल्लारे आदी कर्मचारी उपस्थित होते सदर कारवाई सर्व वार्डातील थकबाकीधारकांकडे वसुली कामी सदरचे पथक रोज फिरणार असून सर्व मालमत्ताधारकांनी आपल्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी, गाळाभाडे थकबाकी रक्कम लवकरात लवकर भरून श्रीरामपूर नगर परिषदेस सहकार्य करावे असे आवाहन श्रीरामपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप व नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

तसेच मार्च महिन्यामुळे नागरिकांना सुविधा म्हणून शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी देखील कर भरणा करण्यासाठी वसुली विभागाचे कार्यालय सुरु ठेवण्यात येणार आहे. याची सर्व मालमत्ताधारकांनी नोंद घ्यावी.

## राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याच्या प्रक्रियेला वेग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : महाराष्ट्र शासनाने १२ सप्टेंबर २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील राजकीय व सामाजिक आंदोलनांमधील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक (अहिल्यानगर) यांची भेट घेऊन संघटनेच्या कार्यकर्त्यांवरील गुन्हे तातडीने मागे घेण्याबाबत निवेदन दिले.शासकीय निर्णयानुसार, ३१ मार्च २०२५ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, ज्या गुन्ह्यांमध्ये ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील, ते खटलेही नियमानुसार मागे घेता येणार आहेत. शेतकरी संघटनेने श्रीरामपूर जिल्हा सत्र न्यायालयासह जिल्ह्यातील विविध न्यायालयांत प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती प्रशासनाला सादर केली.जिल्हाध्यक्ष **अनिल औताडे** यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने या शासन निर्णयाची प्रत प्रशासकीय अधिकाऱ्यांना सोपवली. आंदोलनादरम्यान सार्वजनिक हितासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या निदर्शनांमुळे हे गुन्हे दाखल झाले होते, त्यामुळे प्रशासनाने पोलीस यंत्रणेला योग्य त्या सूचना देऊन हे खटले निकाली काढावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या शिष्टमंडळात अनिल औताडे, युवराज जगताप, सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, सतीश नाईक, दिलीप औताडे, शैलेश वमने, संतोष पटारे, रमेश औताडे, भरत वमने यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## धामणीत आज रंगणार मल्हार महोत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी** : धामणी ( ता. आंबेगाव ) येथे जिल्हा परिषद केंद्रशाळा धामणी येथे शनिवार ( दि. १४ ) रोजी सायंकाळी ६ ते ९ यावेळेत सांस्कृतिक मल्हार महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शालेय प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रांत अधिकारी गोविंद शिंदे, प्रभारी तहसीलदार डॉक्टर सचिन वाघ, वन परिक्षेत्राधिकारी मंचर विकास भोसले, गट विकास अधिकारी प्रमिला वाळुंज, पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे, माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले, दैनिक सामनाचे उपसंपादक विठ्ठल जाधव, वसंतराव जाधव यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणारा आहे यावेळी शाळेला सहकार्य करणाऱ्या माजी विद्यार्थी व काही मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे सदर कार्यक्रमासाठी धामणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आव्हान धामणी ग्रामस्थांनी केली आहे

# महिला बस चालकाचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : नगर परिषद वैजापूर व महिला व बालकल्याण विभागाच्या राष्ट्रीय आजीविका अभियानांतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव सोहळा नुकताच पार पडला. यात वैजापूर बस डेपो आगारातील पहिल्या महिला चालक वाहक वनिता मोरे यांचा कर्तृत्वान महिला गुणगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी यांच्या हस्ते वनिता मोरे यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपाध्यक्ष शेख रियाज, मुख्याधिकारी भागवत बिघोत , माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी, आगार प्रमुख किरण धनवटे, बी के गरुड, मनीष गणवीर आदींनी शुभेच्छा दिल्या.




## टाकळीभान येथील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास मदतीचा ओघ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : टाकळीभान येथे बसस्थानक परीसरात छत्रपती शिवरायांच्या जयंतीला उभाण्यात आलेल्या आश्वारुढ पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी ग्रामस्थांकडुन आर्थिक मदतीचा ओघ चांगलाच सुरु झाला आहे.

टाकळीभान येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात यावा ही गेली चाळीस वर्षांपासुन मागणी होती. गावाचे राजकारण करणाऱ्या स्थानिक गावपुढार्यांकडे शिवप्रेमींची सातत्याने मागणी होत होती. अनेक ग्रामसभांमध्येही ही मागणी केली जात होती. गेली चाळीस वर्षे ग्रामपंचायतीचे सत्ताधारी गटाकडुन आश्वासन दिले जात होते मात्र कृती होताना दिसत नव्हती. या आश्वासनांच्या दलदलीत सार्वजनीक ठिकाणच्या जागांवर अतिक्रमणाचा पाऊस पडला मात्र छत्रपतीचा पुतळा राहुन गेला होता.



नुकत्याच पार पडलेल्या छत्रपतींच्या ६ मार्च रोजी साजरी केलेल्या जयंती निमित्त शिवभक्त बाळराजे आवारे पाटील यांच्या आर्थिक सहकार्यांने बसस्थानक परीसरात भव्य २० फुटी आश्वारुढ पुतळा साकारला गेला आहे. या पुतळ्यामुळे शिवभक्तांमध्ये उत्साह संचारल्याने भव्य स्वरुपात शिवजयंती साजरी केली गेली. प्रत्येक घरातील माणुस या आनंद सोहळ्यात सहभागी झाला होता. पुतळ्याच्या चारही बाजुने आकर्षक सुशोभिकरण करावे यासाठी अनेक हात पुढे सरसावले आहेत. अनेक शिवभक्त आर्थिक मदतीसाठी पुढे आले आहेत. लग्न समारंभात सत्काराला फाटा देवुन तर वाढदिवसाचा खर्च टाळुन थेट छत्रपतींच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी स्वखुशीने देणगी दिली जावु लागली आहे. अनेक वर्षाचे स्वप्न पुर्ण झाल्याने पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी मदतीचा चांगलाच ओघ सुरु झाला आहे.

# बदलत्या हवामानाचा डाळिंब पिकाला फटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी** : पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बदलत्या हवामानाचा डाळिंब पिकावर विपरीत परिणाम होत असून फळधारणा समाधानकारक नसल्याने डाळिंब उत्पादक शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाढलेला पाऊस, आर्द्रता, सतत ढगाळ वातावरण आणि रिमझिम पावसामुळे फलधारणेत अडथळे येत आहेत.

लागवड तंत्रज्ञानातील बदल, नवीन रोगराई, प्रतिकूल हवामान आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे डाळिंब शेतीत मोठी उलथापालथ झाली आहे. दरवर्षी खर्च आणि बाजारभाव वाढत असले तरी लागवड क्षेत्र आणि उत्पादनात सातत्याने घट होत आहे.

डाळिंब हे कमी पाण्यातही उत्पादन देणारे पीक असल्याने दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ते फायदेशीर ठरते.

> हवामानातील बदलांमुळे अनेक शेतकऱ्यांनी डाळिंब बागा काढून टाकल्या आहेत. डाळिंब शेतीसाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते. वातावरण आणि बाजारभाव यांचा योग्य मेळ साधला तर उत्पादन वाढून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते.
> अशोक धानापुणे, डाळिंब उत्पादक शेतकरी, जारकरवाडी (ता. आंबेगाव, जि. पुणे)

मात्र हवामान बदलांमुळे उत्पादनात घट होत असून शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.डाळिंबाला वर्षभर मागणी असून गुणवत्तेनुसार प्रतिकिलो १०० ते २०० रुपये दर मिळतो. एकरी आठ ते दहा लाखांपर्यंत उत्पादनाची क्षमता असली तरी औषधे, खते आणि मजुरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वाढलेल्या खर्चामुळे सुमारे ६५ टक्के शेतकरी अयशस्वी ठरत असून केवळ ३५ टक्के शेतकरीच यशस्वी ठरत असल्याचे चित्र आहे.

**डाळिंब पिकासमोरील आव्हाने :**
वाढलेला पाऊस व आर्द्रता निमॅटोड व मररोग नियंत्रणाबाहेररिमझिम पावसामुळे फलधारणेत अडथळे उन्हाचा अभाव व सतत ढगाळ वातावरण कळीकूज, फळकूज व मूळकूज रोगांचा प्रसारखर्च वाढला; उत्पादन घटले

**नवीन तंत्रज्ञानाचा वापर :**
मातीबेडवर लागवड व सिंगल-खोड तंत्रफळधारणेसाठी मधमाशी पेट्यांचा वापर आच्छादनाद्वारे ऊन व रोगांपासून संरक्षण रासायनिकांचा मर्यादित वापर, सेंद्रिय व जैविक खतांचा वापर ट्रॅक्टरद्वारे फवारणी हवामान यंत्रणा, सीसीटीव्ही व झटका यंत्रणा तज्ज्ञ कार्यशाळा व प्रशिक्षण स्लरीचा नियंत्रित वापर

## मौजमजेसाठी विद्युत मोटर चोरी करणाऱ्या चोरट्यास अटक

१,४३,७०० किमतीचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव (ता. आंबेगाव)** : शेतकऱ्यांच्या पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला पारगाव (कारखाना) पोलिसांनी अटक करत मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ५ विद्युत मोटारी जप्त केल्या असून ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. जप्त मालाची एकूण किंमत सुमारे १ लाख ४३ हजार रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. परिसरात शेतकऱ्यांच्या विहिरींमधून व पाण्याच्या ठिकाणांवरून मोटार चोरीचे प्रकार वाढल्याने आरोपींचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले होते. यानुसार पोलीस कॉन्स्टेबल संजय साळवे, मंगेश अभंग यांना गोपनीय माहिती मिळाली की, जारकरवाडी (ता. आंबेगाव) परिसरात काही इसम पांढऱ्या रंगाच्या कारमधून चोरीच्या विद्युत मोटारी घेऊन जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहन ताब्यात घेतले. वाहनातील इसमांची चौकशी केली असता त्यापैकी एकाचे नाव प्रसाद दत्तात्रय कुक्रे (वय २३, रा. औरंगपूर, ता. जुन्नर, जि. पुणे) असे असल्याचे समोर आले. त्याच्यासोबत एक विधिसंघर्षग्रस्त बालक असल्याचेही पोलिसांनी सांगितले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये शेतातील पाण्यात वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारी आढळून आल्या. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन पुढील चौकशी केली असता विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोटर चोरीचे गुन्हे केल्याचे उघड झाले. या कारवाईत पारगाव, शिरूर आणि नारायणगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

## धामणी येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना अध्यक्षपदी डॉ. अशोककुमार पगारिया

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी (ता. आंबेगाव)**: येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज धामणी येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी डॉ. अशोककुमार पगारिया, तर उपाध्यक्षपदी अंकुश भुमकर आणि भगवान वाघ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा बुधवार (दि. ४) रोजी आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास बहुसंख्य माजी विद्यार्थी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय-धोरणानुसार आणि शासनाच्या परिपत्रकानुसार माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली.या संघाच्या माध्यमातून शाळेच्या भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. खजिनदारपदी संदीप निवृत्ती बोराडे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून ज्ञानेश्वर नानाभाऊ विधाटे, रामदास म्हतारबा जाधव, रेश्मा अजित बोऱ्हाडे, आदिनाथ माधवराव जाधव, विलास नेनसुख पगारिया, शांताराम गेण जाधव, राजेंद्र नामदेव वाकचौरे, देवानंद दत्तात्रय जाधव, श्रीराम बळवंत विधाटे, दादाभाऊ मारुती गाढवे, बाबासाहेब शिवराम बढेकर, मयूर संभाजी सरडे, वामनराव धोंडीबा जाधव आणि दत्तात्रय धोंडीबा भोजणे यांची निवड करण्यात आली.सचिव म्हणून प्राचार्य सोमवंशी एम. ई. कार्यरत राहणार आहेत. कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मुख्याध्यापकांकडून सत्कार करण्यात आला. कार्यकारिणीची निवड करताना माजी पंचायत समिती सदस्य रविंद्र करंजखेले यांचे सहकार्य लाभले.यावेळी अध्यक्ष डॉ. अशोककुमार पगारिया यांनी मार्गदर्शन केले, तर मुख्याध्यापक सोमवंशी यांनी संघ स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर विधाटे यांनी केले.

CHANGE OF NAME
I HAVE CHANGE MY OLD NAME
FAIMIDA SHAKEEL SHAIKH
(IN PASSPORTNO. J2780806)
( BEFORE NAME ) TO
NEW NAME ASFAIMMIDA SHAKEEL SHAIKH
(AADHAR NO. 4489 8088 6500)FROM VIDE FFIDAVITBEFORE NOTARY PUBLICSHRIRAMPURPLACE: SHRIRAMPUR
DATE : 13/02/2026

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .१४ मार्च २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२९ ४८० २४६ **२-०** १९० २८० २४४
जोड २१-८०-९३-६४-६०

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२० ३४६ ५८० **३-६** १२३ १५० ११४
जोड ३१-०६-७२-८९-६८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

- **सुट्टी** -
जोड -

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# जुन्नरमध्ये दिवसाढवळ्या विद्यार्थिनीवर जीवघेणा हल्ला; आरोपी फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जुन्नर** : जुन्नर शहर बुधवारी सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने अक्षरशः हादरून गेले. आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहासमोर एका तरुणाने महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर धारदार हत्याराने सपासप वार केल्याची गंभीर घटना घडली. दिवसाढवळ्या झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास २० वर्षीय विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे वसतिगृहाच्या परिसरात उभी होती. त्याच वेळी महेश मुरलीधर डामसे नावाचा तरुण तेथे आला. सुरुवातीला काय घडत आहे हे कोणालाच समजले नाही. मात्र काही क्षणांतच त्याने हातातील धारदार हत्यार काढून तरुणीवर सपासप वार करण्यास सुरुवात केली.आरोपीने विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर आणि मानेवर वार केल्याची माहिती समोर येत आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थिनी आणि परिसरातील नागरिक घाबरून गेले.

आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक आणि विद्यार्थिनी घटनास्थळी धावत आल्या. मात्र तोपर्यंत आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता. जखमी अवस्थेत पडलेल्या विद्यार्थिनीला स्थानिक नागरिकांनी तातडीने उचलून जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या तिच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, जखमी विद्यार्थिनी आणि हल्ला करणारा तरुण हे दोघेही एकाच गावचे असल्याचे समोर आले आहे. आरोपी काही दिवसांपासून त्या तरुणीला त्रास देत होता, अशी माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे. त्यातूनच हा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच जुन्नर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा केला असून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

या घटनेमुळे जुन्नर शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीला तातडीने अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## द • ख • ल

### संत सेना महाराज महिला मंडळाचा कार्यक्रम उत्साहात




**भाळवणी** : ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त संत सेना महाराज मंदिर (भोसरी) येथे संत सेना महाराज महिला मंडळाच्या वतीने कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्नेहाताई निलेश गायकवाड व उपाध्यक्ष मोहिनीताई आशिष उरकुडकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती ॲड. लक्ष्मीताई सावंत (मुक्ताई भजनी मंडळ, भोसरी), लताताई शिनकर, लांडे मॅडम, महाराष्ट्र परिवहन मंडळ पुणे राजगुरुनगर कार्यरत असणाऱ्या वैशालीताई पाटील, महानगरपालिका हॉस्पिटल भोसरी कार्यरत असणाऱ्या पूनमताई बिडवे, चंद्रभागा भीष्म गायकवाड, पुष्पाताई भालेकर, मंदाताई घायतडक, छायाताई जाधव, रेश्मा ताई पंडित, राणीताई पंडित, निर्मिती हॉस्पिटल मोशी कार्यरत असणाऱ्या प्रमिलाताई भालेकर, उत्कृष्ट फोटोग्राफर उषाताई भटकर, अर्चनाताई पंडित, अर्जुन पाटील, सोहम पंडीत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवर महिला पदाधिकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

### निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन



**अहिल्यानगर** : तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू-वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे. हा वधू-वर परिचय मेळावा शनिवार, दि. १४ मार्च रोजी न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. सकाळी उद्घाटन सत्रानंतर वधू-वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे. या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक-युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांना एकाच ठिकाणी एकमेकांची माहिती मिळावी आणि संवाद साधता यावा, यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. सहभागी होणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांनी आपल्या मुला-मुलींचा बायोडाटा व फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच मेळाव्याबाबत अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संजय कांबळे (मो. ९९७०७७५५२२) व अशोक बागुल (मो. ९८८१८२७८९२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सर्वसामान्यांना उपचारासाठी मोठा आधार : महापौर ज्योती गाडे



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत गरजू नागरिकांना धनादेशांचे वाटप महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सध्या समाजामध्ये विविध प्रकारचे आजार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील अनेक व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष करत असतात. त्यामुळे त्या आजाराचे वेळेवर निदान होत नाही आणि पुढे गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या माध्यमातून महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी सुरू करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून गरजू नागरिकांना आपल्या आजारपणाचे वेळेत निदान करून घेता येते तसेच योग्य वेळी डॉक्टरांकडून उपचार घेण्यास मदत मिळते. यामुळे संबंधित व्यक्तीचे आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहण्यास मोठा हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, सुप्रिया जाधव, शेखर देशपांडे तसेच रोहन सानप आदी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेला महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी हा सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक कुटुंबांना या निधीमुळे मोठा दिलासा मिळत आहे. त्यामुळे शहरातील गरजू नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# श्रीगोंद्यात गौण खनिज तस्करांचा धुमाकूळ

## ‘अधिकारी खातायत माती’, कारवाई करणार तरी कोण?

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यात सध्या माती, मुरुम आणि इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला अक्षरशः ऊत आला आहे. दिवसभर ट्रॅक्टर-ट्रॉली, डंपर आणि टिप्परच्या माध्यमातून खुलेआम माती व मुरूमची वाहतूक सुरू असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे हा सगळा प्रकार प्रशासनाच्या डोळ्यासमोर घडत असतानाही कारवाई मात्र शून्य असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तलाठी, मंडळ अधिकारी आणि काही तस्कर यांच्यात साटेलोटे असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या आहेत. त्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांना जणू मोकळे रान मिळाले आहे. दिवसाढवळ्या माती-मुरूम काढून त्याची वाहतूक केली जात असतानाही महसूल प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.तालुक्यातील विविध गावांच्या हद्दीतून शेतीजमीन, ओढे आणि मोकळ्या जागांतून मोठ्या प्रमाणावर माती व मुरूम उपसा केला जात आहे. या अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शिवाय रस्त्यांवरून धावणाऱ्या जड वाहनांमुळे ग्रामस्थांना धूळ-प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान, या प्रकाराची सखोल चौकशी करून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, तसेच संबंधित महसूल अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा श्रीगोंदा तालुक्यातील नैसर्गिक संपत्तीवर दिवसाढवळ्या डल्ला मारण्याचे प्रकार थांबणे कठीण असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**नागरिकांचे गंभीर आरोप**

* तालुक्यात अवैध माती-मुरूम उत्खनन वाढले
* दिवसाढवळ्या ट्रॅक्टर-डंपरने वाहतूक
* तलाठी-मंडळ अधिकारी व तस्कर संगनमताच्या चर्चा
* महसूल प्रशासनाची कारवाई शून्य

**साहेब तुमची बदली होते आम्ही कुठे जायचे ?**

श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात चालू असलेल्या तस्करीच्या धुमाकुळामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असून धुळीचे साम्राज्य वाढत चालले आहे हा त्रास येथील नागरिकांनाच सहन करावा लागणार आहे त्यामुळे तालुक्यातील एक शेतकरी अधिकाऱ्याला आर्त हाक मारून सांगत आहे साहेब तुमची बदली होते आम्ही कुठे जायचे ? मात्र याबाबत कोणीही बोलण्यास तयार नाही.

त्याबाबत नागरिकांमध्ये मात्र एकच चर्चा रंगली आहे अधिकारीच माती खात असतील, तर तस्करांना अटकाव करणार तरी कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांच्या कथित संगनमतामुळेच हा अवैध धंदा दिवसेंदिवस वाढत असल्याचीही चर्चा तालुक्यात सुरू आहे.त्यामुळे याकडे जिल्हाधिकारी यांनी तात्काळ लक्ष देण्याची मागणी जोर धरताना दिसत आहे.

## ढोरजळगांवने रस्त्याचे रूप पालटले

### आमदार मोनिका राजळे दिला भरीव निधी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांवने ते तेलकुडगांव सिमेंट क्राँकेटीकरण रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वास असुन या रस्त्यासाठी आमदार राजळे यांनी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे या रस्त्याचे रूप पालटले आहे.

शेवगांव व नेवासा सरहद्दीवर असणारा ढोरजळगांव ते तेलकुडगांव रस्ता स्वातंतोत्तर काळानंतर या रस्त्याचे काम आमदार मोनिकाताई राजळे यांच्या प्रयत्नामुळे पुर्णत्वास गेले असुन वेळोवेळी या रस्त्यासाठी ग्रामस्थांकडून पाठपुरावा करण्यात येत होता या रस्त्यामुळे नेवासा तालुक्याला कमी वेळेत जाण्यासाठी ओळखला जात असुन या रस्त्यामुळे ऊस वाहतूकीसाठी सोयीस्कर म्हणून समजला जातो.

ढोरजळगांवने ते तेलकुडगांव रस्त्यावरून पावसाळ्याच्या दिवसामध्ये नागरीकांना गुडघाभर पाण्यातुन वाट शोधावी लागत असे व शालेय विद्यार्थ्यांना चिखलामध्ये घसरून अपघाताच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत होत्या ढोरजळगांवने येथील ग्रामस्थांनी आमदार राजळे यांच्या कडे वेळोवेळी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती आमदार राजळे यांनी ग्रामस्थांची मागणी विचारात घेत विधानसभा निवडणुकीपुर्वी या रस्त्याचे भुमिपुजन करून त्या रस्त्याचे काम आगामी काही दिवसामध्ये पुर्ण होणार असल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून येत आहे.

दरम्यान, आनंता उकिर्डे (माजी सरपंच) ढोरजळगांवने तेलकुडगांव रस्ता ही महत्त्वाची गरज ओळखून आमदार मोनिकाताई राजळे यांनी मुलभुत गरज ओळखून या रस्त्याला भरीव निधी उपलब्ध करून दिला व रस्त्याच्या कडेला आसणा-या शेतकऱ्यांनी भविष्याची गरज ओळखून आपली असलेली अतिक्रमण काढुन सहकार्य केले असुन कित्येक वर्षानंतर या भागातील शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या प्रश्नाला ख-या अर्थाने न्याय मिळाला आसल्याचे आनंता उकिर्डे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## रमजाननिमित्त मुस्लिम बांधवांना खजूर पाकिटाचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे रमजान महिन्यानिमित्त येथील मुस्लिम बांधवाना खजूर पाकीटचे वाटप करण्यात आले.

रमजान महिना हा मुस्लिम बांधवांचा पवित्र महिना असतो. या महिन्यात सर्व मुस्लिम बांधव एक महिनाभर निरंकार रोजे (उपवास) करून नमाज पठन करतात.

या रमजान महिन्याचे औचित्य साधून मिरजगाव जिल्हा परिषद गटाचे युवा नेते आणि कोंभळीचे माजी सरपंच दिपकभाऊ गांगर्डे यांच्या पुढाकारातून रमजानच्या रोजा इफ्तार निमित्त मिरजगाव शहर व परिसरातील मुस्लिम बांधवांना मस्जिदमध्ये शुक्रवारी, दि.१३ रोजी गांगर्डे व त्यांच्या सहकाऱ्यांनी खजूर पाकीट देवून अनोख्या पद्धतीने रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या..

यावेळी माजी सरपंच दिपक गांगर्डे, सचिन दरेकर, नितिन उदमले, दादा तनपुरे यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गांगर्डे यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. हा उपक्रम राबवून त्यांनी सामाजिक एकोपा व सलोखा जपत सामाजिक ऐकतेचा संदेश दिला आहे.

महिनाभर अल्लाहाची उपासना करत ईद साजरी होते. या आपल्या बांधवांच्या सणामध्ये आपलाही काहीतरी खारीचा वाटा असावा म्हणून दिपकभाऊ गांगर्डे मित्र मंडळ यांनी मिरजगाव जिल्हा परिषद गटातील गावामधील मुस्लिम बांधवांना खजूर पाकीट देत सामाजिक उपक्रम राबविला आहे.

हिंदू - मुस्लिम ऐक्याकरिता समाजात अनेक उपक्रम विविध सामाजिक संस्था राबविताना दिसतात. परंतु गांगर्डे यांचा हा उपक्रम एकप्रकारे हिंदू - मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडविणारे असुन सर्व समाजासाठी एक चांगला संदेश देवून जातो..

## संत्रा बागेत कांदा बियाणे निर्मितीचा प्रयोग

### सातवड येथील शेतकरी बंडू पाठक यांची अभिनव शेती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी** : तालुक्यातील सातवड येथील प्रगतशील शेतकरी बंडू पाठक यांनी शेतीमध्ये अभिनव प्रयोग करत आपल्या संत्रा बागेत कांदा बियाणे निर्मितीचा उपक्रम सुरू केला आहे. शेतीत नवनवीन प्रयोग करण्याची तयारी आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करण्याची त्यांची दृष्टी यामुळे त्यांचा हा प्रयोग परिसरातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

सुमारे तीन वर्षांपूर्वी पाठक यांनी आपल्या शेतामध्ये संत्र्याची बाग लावली. संत्रा बागेतील झाडांमधील मोकळ्या जागेचा योग्य उपयोग व्हावा आणि त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळावे या उद्देशाने त्यांनी यावर्षी कांद्याच्या गोट्यांची लागवड करून कांदा बियाणे निर्मितीचा प्रयोग हाती घेतला. संत्रा बागेमध्ये आंतरपीक म्हणून कांदा बियाणे उत्पादन घेतल्यामुळे एकाच शेतातून दुहेरी उत्पन्न मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

पाठक यांनी यापूर्वीही दोन वेळा कांदा बियाणे निर्मिती केली असून त्या वेळी तयार झालेल्या बियाण्याला परिसरातील शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यांच्या बियाण्याची उगवणक्षमता चांगली असून दर्जेदार उत्पादन मिळत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या बियाण्याची मागणी केली होती. त्यामुळे यावर्षीही त्यांनी अधिक नियोजनबद्ध पद्धतीने कांदा बियाणे उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, या संत्रा बागेतील कांदा बियाणे निर्मितीच्या प्रयोगाला उपविभागीय कृषी अधिकारी डी. पी. डमाळे (अहिल्यानगर ) तसेच करंजी मंडळाचे कृषी अधिकारी संकेत कराळे यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी पाठक यांच्या प्रयोगाचे कौतुक करत शेतकऱ्यांना दर्जेदार व चांगल्या प्रतीचे कांदा बियाणे उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले. भविष्यात कांदा बियाणे निर्मितीच्या क्षेत्रात पाठक मोठी झेप घेतील, असा विश्वास व्यक्त करत कृषी विभागामार्फत आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

अहमदनगर जिल्ह्यासह परिसरातील शेतकरी बंडू पाठक यांच्या या प्रयोगाकडे उत्सुकतेने पाहत आहेत. संत्रा बागेमध्ये आंतरपीक घेऊन उत्पन्न वाढवण्याचा त्यांचा हा प्रयत्न इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत असून शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यासाठी प्रोत्साहन देणारा आहे.

या भेटीदरम्यान डॉक्टर भगवान वाघ, भाऊसाहेब वाघ, राजेंद्र पाठक आदी शेतकरी उपस्थित होते.

## पारगाव सुद्रिकमध्ये आगळावेगळा महिला दिन

## गोरगरीब महिलांना साड्या, मुलांना कपडे व खाऊ वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा** : जागतिक महिला दिनानिमित्त अनेक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते; पण पारगाव सुद्रिक येथे साजरा झालेला महिला दिन खऱ्या अर्थाने समाजकारणाचा आदर्श ठरला. भाजपच्या तालुका अध्यक्षा संगीता घोडेकर यांनी बाहेरून कामासाठी आलेल्या गोरगरीब महिलांना साड्यांचे वाटप करत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

या उपक्रमात लहान मुलांनाही विसरले गेले नाही. मुलांना नवीन तसेच स्वच्छ धुतलेले कपडे, स्वेटर, कानटोपी, टी-शर्ट देण्यात आले. त्याचबरोबर मुलांना खाऊचेही वाटप करण्यात आले.साडी व कपडे मिळाल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा कोणत्याही मोठ्या उत्सवापेक्षा अधिक समाधान देणारा असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.या सामाजिक उपक्रमाचे परिक्रमा संकुलच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा अक्का यांनी विशेष कौतुक केले. समाजातील वंचित घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबवणे हीच खरी महिला दिनाची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक महिला दिनानिमित्त गोरगरीब महिलांना साडी वाटप करून पारगाव सुद्रिक येथे सामाजिक बांधिलकीचे एक वेगळे उदाहरण उभे राहिले.

# बालविवाहमुक्त गावासाठी ५८० अंगणवाडी सेविकांचा निर्धार!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**नेवासा** : बालविवाह मुक्त समाज निर्माण करण्याच्या दिशेने नेवासे तालुक्यातील तब्बल ५८० अंगणवाडी सेविकांनी बालविवाह रोखण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार केला बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित विशेष प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम गुरुवार (दि. १२) रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.

जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभाग,जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प विभाग,अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा बाल संरक्षण विभाग,चाईल्ड हेल्पलाईन,स्नेहालय उडान प्रकल्प आणि महिला सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेला होता.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्नेहालय उडान प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रविण कदम यांनी यावेळी सखोल मार्गदर्शन केले त्यांनी स्नेहालय संस्थेच्या विविध प्रकल्पांची माहिती देत बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६,बालहक्क,बालविवाहामागील सामाजिक कारणे, बालविवाहामुळे होणारे शारीरिक-मानसिक दुष्परिणाम, पालकांची जबाबदारी,प्रभावी जनजागृती कशी करावी, ग्रामस्तरावर बाल संरक्षण समित्यांची भूमिका या सारख्या विविध महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रविण कदम यांनी यावेळी बोलतांना सांगितले की,बालविवाह हा मुलींच्या आयुष्याला जिवंत नरक यातना बनवणारा प्रकार आहे.लहान वयात लावलेली लग्ने अनेकदा टिकत नाहीत आणि त्यातून मुलींचे शिक्षण, आरोग्य व भविष्य धोक्यात येते. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने या प्रथेविरुद्ध उभे राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी याबाबत अंगणवाडी सेविकांना गावात जनजागृती करताना संवाद कौशल्य,संवेदनशील भाषा आणि समजावून सांगण्याची पद्धत यांचा योग्य वापर कसा करावा याबाबतही मार्गदर्शन केले.तसेच अल्पवयीन मुलींची ओळख पटविणे, जोखमीतील कुटुंबांशी संवाद साधणे आणि बालविवाह रोखण्यासाठी तत्काळ प्रशासनाला माहिती देणे याबाबतही त्यांनी सूचना दिल्या.

या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित अंगणवाडी सेविकांनी बालविवाह प्रतिबंधाशी संबंधित अनेक प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांना प्रविण कदम यांनी समाधानकारक उत्तरे देत प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर उपाय सुचवले. यानंतर महिला सक्षमीकरण केंद्राच्या साक्षी मानकर यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाबाबत मार्गदर्शन केले. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व, त्यांच्या सुरक्षिततेसाठी समाजाची भूमिका आणि मुलींना सक्षम बनविण्याची गरज यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी राहुल वैराळ यांनी चाईल्ड हेल्पलाईन सेवांविषयी सविस्तर माहिती देत १०९८ या हेल्पलाईन क्रमांकाद्वारे संकटात सापडलेल्या बालकांना कशी मदत मिळू शकते याची माहिती दिली.बालविवाह किंवा बालकांवरील अत्याचारासंदर्भात तत्काळ तक्रार करण्याचे आवाहनही त्यांनी केले या कार्यक्रमाच्या शेवटी महिला सक्षमीकरण केंद्राच्या दीपाली भोले यांनी उपस्थित सर्व अंगणवाडी सेविका व मान्यवरांना बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा दिली. गावपातळीवर जनजागृती करून कोणत्याही परिस्थितीत बालविवाह होऊ देणार नाही,असा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागाच्या पर्यवेक्षक संचिता नजन आणि जयश्री मानले या नेवासे तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी घेतलेला हा संकल्प गावागावात बालविवाहमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे यावेळी उपस्थितांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेतल्यास अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचे ध्येय नक्कीच साध्य होईल,असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला या प्रसंगी नेवासे बालविकास प्रकल्प विभागाच्या रेखा कुऱ्हे आणि भावना पवार यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले यावेळी

नेवासे बालविकास प्रकल्पच्या संचिता नजन,विमल साळवे, रंजना खरात,रेणूका गायकवाड,संगीता दळे,आशा लोंढे, अश्विनी घनवट, कल्याणी कडवे, प्रियंका बोरकर, सविता गोसावी यांच्यासह तालुक्यातील अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

द • ख • ल

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पिंकी माळी यांच्या वारसाला पाच लाख रुपयाचा धनादेश सुपूर्द

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते दिवंगत फ़्लाईट अटेंडंट पिंकी शिवकुमार माळी यांच्या वारसाला आर्थिक मदत म्हणून ५ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपमुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी सचिन यादव उपस्थित होते. बारामती येथे २८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अपघातामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत दिवंगत पिंकी शिवकुमार माळी यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला होता, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रुपये देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आज दिवंगत माळी यांचे पती सोमविकास सैनी यांच्याकडे आज धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे, अशी माहिती तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी दिली आहे.



## दिवे परिसरात पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी

**दिवे :** दिवे परिसरात सध्या सिताफळाच्या उन्हाळी हंगामाचे नियोजन शेतकरी करत आहेत. तसेच अंजीराचा मुख्य मिठा हंगामही सुरू झाला आहे. मात्र परिसरात सध्या पाणीटंचाई जाणवत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.पुरंदर उपसा जलसिंचन योजनेअंतर्गत दिवे येथील पंपहाऊसवर सध्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. या कामामुळे काही काळापासून परिसरात पाणीपुरवठा बंद आहे. परिणामी अंजीर व सिताफळ बागांना पाण्याची कमतरता भासत आहे. सध्या अंजीराचा मुख्य हंगाम सुरू असल्याने तसेच पुढील उन्हाळी हंगामासाठी सिताफळ बागांचे नियोजन सुरू असल्याने शेतकऱ्यांना पाण्याची तातडीची गरज आहे. पाणीअभावी बागायती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. म्हणूनच पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून दिवे परिसरात लवकरात लवकर पाणी सोडावे, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



## मलठण केंद्र शाळेत रंगला 'आठवडा बाजार चिमुकल्यांनी अनुभवले खरेदी-विक्रीचे व्यवहार

**मलठण :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, मलठण व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'आठवडा बाजार' व 'आनंद मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहाराचे शिक्षण मिळावे, या उद्देशाने भरवण्यात आलेल्या या बाजाराला ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात विविध स्टॉल्स लावले होते. यात प्रामुख्याने ताजी मेथी, कोथिंबीर, शेपू यांसारख्या पालेभाज्या, फळे, तसेच घरगुती तयार केलेले खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. मुलांनी स्वतः वजनकाटा हाताळणे, पैशांचा हिशोब करणे आणि ग्राहकांशी संवाद साधणे अशा गोष्टींमधून व्यवहार ज्ञानाचे धडे गिरवले. शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ वाव्हळ यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगी व्यावसायिक कौशल्य आणि आत्मविश्वास निर्माण होतो. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पाबळ कान्हूर मेसाईत टँकरची मागणी

**पाबळ :** शिरूर तालुक्यातील पाबळ व कान्हूर मेसाई परिसरातील विहिरींनी तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे गावाचा पाणीपुरवठा विस्कळित झाला असून, ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पाबळ व कान्हूर मेसाई ही गावे दुष्काळग्रस्त म्हणून ओळखली जातात. उन्हाळ्यात येथील पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य विहिरी आणि इतर जलस्रोत कोरडे पडतात. त्यामुळे गाव व वाड्यावस्त्यांना पाणी मिळणे कठीण झाले आहे. याशिवाय जनावरांसाठी चारा टंचाईचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. डोंगराळ भौगोलिक रचनेमुळे काही वाड्यांपर्यंत पाणी पोहोचवणेही कठीण झाले आहे. त्यामुळे ग्रामस्थांचे हाल वाढले असून, त्वरित टँकरची सुविधा सुरू न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, अशी चिंता स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. , लवकर निर्णय न घेतल्यास परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता आहे.



# बारामतीत २८हुन अधिक गावांमध्ये जलसंधारणाची कामे

### एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या माध्यमातून होतंय जलसंधारण चळवळ रुजविण्याचे काम : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** जलसंधारण चळवळ प्रभावीपणे रुजविण्याच्यादृष्टीने एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या माध्यमातून तालुक्यातील २८ हुन अधिक गावांमध्ये जलसंधारणाची कामे केली आहेत, त्यामुळे सुमारे ५० कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठ्यात वाढ होवून या गावातील पाणी टंचाईकमी होण्यास मदत झाली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.



एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडिया-बारामतीच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी पंचायत समितीचे सभापती किरण तावरे, नगराध्यक्ष सचिन सातव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, माळेगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष सुयोग सातपुते, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, तहसीलदार स्वप्नील रावडे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, आयडीबीआयचे मुख्य व्यवस्थापक आशुतोष कुमार, फोरमचे सदस्य आदी उपस्थित होते.

पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडिया-बारामतीच्या माध्यमातून मागील १६ वर्षांपासून विविध क्षेत्रात सक्रिय काम सुरु होते. विविध क्षेत्रात ठसा उमटवत बारामतीच्या विकासामध्ये खारीचा वाटा उचलला आहे.

फोरमच्या माध्यमातून नागरिकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ६ हजार नागरिकांच्या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, कर्करोग व्याख्यान आणि तपासणी शिबीर, पर्यावरण जनजागृतीच्यादृष्टीने प्रतिबिंब व्याख्यानमाला, विज्ञान जत्रा, वृक्षारोपण, पाणीवठे निर्मिती, मातीतील खेळ जत्रा, हॅप्पी स्ट्रीट आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वप्नातील स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बारामती घडविण्याची आपली सामूहिक जबाबदारी कामे आहे. समाजातील सेवाभावी संस्थेने या कामी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्रीमती पवार म्हणाल्या.

बारामती जेष्ठ नागरिक निवास येथे सीएसआर निधीतील फॅको मशिन तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे सीएसआर निधीतून देण्यात आलेल्या रेडिओग्राफी मशिनचे प्रातिनिधिक स्वरुपात हस्तांतरण करण्यात आले.

यावेळी जुन्नर येथील पर्यावरण क्षेत्रात विशेष कामगिरी करणारे रमेश आणि स्वाती खरमाळे यांना २०२६ चा वसुंधरा पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच डॉ. परिक्षित गोगटे, अभिजित चौधर, डॉ. पुरूषोत्तम पवार, डॉ. राधिका शहा- वाघोलीकर आणि जलतरणपटू वरदा कुलकर्णी यांना बारामती आयकॉन-२०२६ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## आरक्षित दफनभूमीची जागा लवकरच हस्तांतरीत करणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** येथील मंजूर विकास आराखड्यातील आरक्षित दफनभूमी व स्मशानभूमीची जागा लवकरच नागरिकांच्या वापरासाठी हस्तांतरीत करण्याची प्रक्रीया नगरपरिषदेच्या माध्यमातून सुरू करण्यात आली असल्याची माहिती नगरसेवक आलताफ सय्यद यांनी दिली. राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी बारामती शहरातील मुस्लिम समाजाची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन मंजूर विकास आराखड्यात नगरपरिषदेच्या वाढीत हद्दीतील जळोची, तांदूळवाडी, रुई व बारामती ग्रामीण या भागात स्मशानभूमीसाठी आठ तर दफनभूमीसाठी सहा ठिकाणच्या जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. नुकत्याच नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेमध्ये नगरसेवक आलताफ सय्यद यांनी दफनभूमी आरक्षित जागेबाबत विषय घेतला होता. त्या विषयास नगराध्यक्ष सचिन सातव यांनी सूचना केल्यामुळे मुख्याधिकारी पंकज भुसे, आलताफ सय्यद, नगररचना कार्यालयाचे नगररचनाकार श्रीकांत गिते. प्रभारी नगररचनाकार विनोद कांबळे, सहाय्यक नगरचनाकार सुमित काशिद यांनी प्रत्येक्ष आरक्षित ठिकाणी स्थळपाहणी करून, संबंधित जागा मालकांना बाधित क्षेत्राचा आगाऊ ताबा नगरपरिषदेस देणेबाबत संमती दर्शक प्रस्ताव सादर करण्याबाबत व त्या मोबदल्यात एफएसआय/टीडीआर देण्यास तयार असल्याचे पत्र पाठविण्यात आले आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांचेकडे अल्पसंख्यांक विकास विभाग हे खाते असल्याने त्यांच्या सहकार्याने या आरक्षित जागेत संरक्षण भिंत व सुशोभिकरण करण्यास लागणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा करण्यात येईल असेही आलताफ सय्यद यांनी सांगितले.




## माऊलींच्या संजीवन समाधीवरील चंदन उटी पूजेची नोंदणी सुरू

### गुढीपाडव्यापासून भाविकांना पूजेसाठी संधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीवरील पारंपरिक चंदन उटी पूजेची नोंदणी सुरू झाली असून गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारपासून (ता.२०) भाविकांना चंदन उटी पूजेसाठीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.ग्रीष्म ऋतूमध्ये माऊलींच्या संजीवन समाधीला शीतलता मिळावी, या उद्देशाने चंदनाची उटी लावण्याची परंपरा आहे. चंदन उटी पूजा म्हणजे भाविकांसाठी कुटुंबियांसह संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीसमोर बसून पूजा करण्याची एक आध्यात्मिक पर्वणी मानली जाते. त्यामुळे या पूजेला विशेष महत्त्व आहे.



माऊलींच्या संजीवन समाधीवर प्रतिवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) ते ७ जूनपर्यंत चंदन उटी लावण्यात येते. गुढीपाडव्याच्या दिवशी आळंदी देवस्थानतर्फे समाधीवर चंदन उटीद्वारे आकर्षक सजावट केली जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून (ता.२०) सर्वसामान्य भाविकांसाठी चंदन उटी पूजेसाठी नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या पूजेसाठी ११ हजार रुपये देणगी शुल्क निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये पूजेचे साहित्य, दक्षिणा तसेच एका कुटुंबातील पाच जणांना दुपारी दीड ते तीन या वेळेत माऊलींच्या संजीवन समाधीसमोर बसून पूजेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.दरम्यान, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीवर गुढीपाडव्याच्या दिवशी श्री गणेश अवतार, रामनवमीच्या दिवशी महादजी शिंदे सरकारांची 'शिंदेशाही उटी' प्रतिकृती, नृसिंह जयंतीनिमित्त नृसिंह अवतार तसेच अक्षय तृतीया दिवशी पांडुरंगाचा अवतार चंदन उटीच्या माध्यमातून साकारला जातो. या आकर्षक उटी सजावटीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करत असतात.

## सासवडच्या वाघीरे विद्यालयात पुस्तक प्रदर्शनाने विद्यार्थी भारावले

नितीन यादव ! राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** काहीं दिवसांवर येऊ घातलेल्या हिंदु संस्कृतीचा गुढी पाडवा हा सण व वाचनाचे महत्त्व अधोरेखित करणारे पुस्तक प्रदर्शन यावर आधारित ज्ञान आणि कल्पकतेची जोड असणाऱ्या, विद्यार्थी व पालक यांना भावलेल्या एका सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सासवड येथील एमईएस संस्थेच्या वाघीरे विद्यालयात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी गुढी उभारणीची प्रतिकृती बनवत उपस्थितांची वाहवा मिळवली. याच कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध विषयांच्या पुस्तकाचे प्रदर्शन देखिल आयोजित करण्यात आले होते त्याला देखील विद्यार्थी व पालक यांनी भरभरून दाद देत पुस्तके विकत घेतली

विद्यार्थ्यांच्या अंगी कलागुण निर्माण व्हावेत तसेच त्याला वाचनाची गोडी निर्माण व्हावी, वाचन संस्कृती वाढीला लागावी या उद्देशाने या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती विद्यालयाच्या प्राचार्या पुजा जोग यांनी दिली. सासवड येथील नवोदित प्रकाशक व ज्याची चारशेहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत त्या परीस पब्लिकेशनच्या गिरीश भांडवलकर याचे या पुस्तक प्रदर्शनात विशेष कौतुक झाले. अनेक मुलांमुलींनी पुस्तके विकत घेऊन त्यावर प्रतिक्रियाही व्यक्त केल्या पुस्तकांसाठी १० टक्क्यांपासून ६५ टक्क्यांपर्यन्त सवलत देखील देण्यात आली होती.

विद्यालयाचे शिक्षक विनोद पारे यांनी या उपक्रमात विशेष सहभाग घेत मुलांच्या कलागुणांना वाव दिला. माजी मुख्याध्यापक श्री वा. कुलकर्णी,अॅड प्रशांत जोशी, सौ अनिता भोसले (शिंदे) आदींनी उपक्रमाविषयी सुंदर प्रतिक्रिया पाठवत शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत एका वेगळ्या पद्धतीच्या उपक्रमाला पालकांनी देखील दाद देऊन अभिनंदन केले आहे




# जयाद्री ते सह्याद्री डोंगररांगांत वणव्यांचा कहर

### तापमानवाढीचे चटके, वन्यजीव-वनस्पती भस्मसात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर :** राज्यातील महत्वपूर्ण डोंगररांगा पुणे जिल्ह्यातील जेजुरी-कडेपठार, पुरंदर परिसरासह सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील कोयना, वाघापूर, तारळे खोऱ्यात निसर्गसंपत्तीला मोठा फटकाजयाद्री ते सह्याद्री या विस्तीर्ण डोंगररांगांत सध्या ठिकठिकाणी वणवे पेटू लागल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. वाढते तापमान, कोरडे वातावरण आणि काही ठिकाणी मानवी हस्तक्षेप यामुळे या डोंगरदर्यांत आगीच्या घटना वारंवार घडू लागल्या आहेत. परिणामी या भागातील सरपटणारे वन्यजीव, लहान जीवजंतू तसेच मौल्यवान वनस्पती अक्षरशः आगीत भस्मसात होत असल्याचे दिसून येत आहे.



विशेषतः जेजुरी परिसरातील जयाद्री कडेपठार, पुरंदर किल्ल्याच्या डोंगररांगा, सासवड परिसर या भागांत सध्या वणवे पेटल्याची दृश्ये वारंवार दिसत आहेत. डोंगर उतारावरील सुकलेले गवत, झुडपे आणि पानगळ झालेली झाडे यामुळे आग वेगाने पसरत असल्याने वनसंपदेचे मोठे नुकसान होत आहे.याचबरोबर पश्चिमेकडे जोडलेल्या सह्याद्री पर्वतरांगांतही परिस्थिती चिंताजनक बनली आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील कोयना सडा, वाघापूर खोरे, तारळे खोरे तसेच आसपासच्या डोंगरदर्यांत वणवे पेटल्याच्या घटना वाढल्या आहेत. या भागात जैवविविधतेने समृद्ध असलेल्या अनेक दुर्मिळ वनस्पती, औषधी वनस्पती आणि विविध प्रकारचे वन्यजीव आढळतात. मात्र वणव्यामुळे या निसर्गसंपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

वनव्यामुळे केवळ झाडे जळून खाक होत नाहीत, तर जंगलातील मातीची सुपीकता आणि नैसर्गिक रचना देखील गंभीरपणे बाधित होते. आगीमुळे जमिनीतील ओलावा पूर्णपणे नष्ट होतो, जमिनीची सचिद्रता कमी होते आणि पावसाचे पाणी जमिनीत न मुरता थेट वाहून जाते. परिणामी मृदधूप वाढून भविष्यातील वनवाढीवरही परिणाम होतो.

जयाद्री परिसरात काही ठिकाणी चुकीच्या समजुतीतून किंवा निष्काळजीपणातून डोंगरांवर आग लावण्याचे प्रकार घडत असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे निसर्गसंपत्तीचे नुकसान तर होतच आहे, शिवाय संपूर्ण डोंगररांगांचे पर्यावरणीय संतुलन धोक्यात येत आहे.

वनसंपदेचे संरक्षण करण्यासाठी वनविभाग, वन्यजीव विभाग आणि वनस्पतीशास्त्र अभ्यासक यांनी एकत्रितपणे प्रभावी उपाययोजना राबवणे अत्यावश्यक असल्याचे मत निसर्गप्रेमी व वनस्पती अभ्यासक अनिल बोधे यांनी व्यक्त केले. डोंगररांगांत लागणारे वणवे जैवविविधतेसाठी मोठे संकट आहेत. पाणी, प्राणवायू, स्वच्छ हवा आणि असंख्य जीवसृष्टी या जंगलांवर अवलंबून आहे. त्यामुळे वनसंपदेचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.'

## रांजणगाव सोसायटीच्या अध्यक्षपदी सतिश शेळके

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**रांजणगाव गणपती :** - शिरुर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी सतिश फक्कड शेळके यांची बिनविरोध निवड झाली.येथील सोसायटीच्या कार्यालयात संचालक मंडळाच्या बैठकीत निवडीचा कार्यक्रम पार पडला.मावळते अध्यक्ष गोरक्ष गदादे यांनी ठरल्याप्रमाणे अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या अध्यक्षपदाच्या जागेवर शेळके यांची बिनविरोध निवड झाली.निवडीनंतर शेळके यांचा जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचुंदकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी सोसायटी संचालक, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रशांत पिसाळ यांनी काम पाहिले.त्यांना सचिव दिलीप पुणेकर यांनी सहकार्य केले.



# अजित पवारांच्या पावलावर पाऊल

### सुनेत्रा पवारांचा बारामतीत जनता दरबार, नागरिकांची मोठी गर्दी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सध्या बारामती दौऱ्यावर असून शुक्रवारी (दि.१३) रोजी सकाळी त्यांनी 'सहयोग' येथील निवासस्थानी जनता दरबार आयोजित केला. या माध्यमातून त्यांनी नागरिकांच्या समस्या थेट ऐकून घेत तात्काळ सोडवण्याचे आश्वासन दिले.



माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सुरू केलेल्या जनता दरबाराच्या परंपरेप्रमाणेच सुनेत्रा पवार यांनीही नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. विशेषतः महिलांच्या समस्या सोडवण्यावर त्यांनी भर दिला असून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

सकाळी आठ वाजल्यापासूनच 'सहयोग' सोसायटी परिसरात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. बारामती तालुक्यातील विविध गावांमधून नागरिक आपल्या तक्रारी आणि समस्या मांडण्यासाठी येथे आले होते. यामध्ये महिलांची संख्या विशेषतः लक्षणीय होती.

यावेळी महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अडचणी, स्थानिक नागरी समस्या तसेच वैयक्तिक अडचणी सुनेत्रा पवार यांच्यासमोर मांडल्या. प्रत्येक तक्रार संयमाने ऐकून घेत त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना या तक्रारींवर प्राधान्याने कार्यवाही करून त्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे निर्देश दिले. दरम्यान, बारामती वकील संघटनेच्या सदस्यांनीही सुनेत्रा पवार यांची भेट घेत विविध व्यावसायिक प्रश्नांवर चर्चा केली. नागरिकांच्या समस्या थेट ऐकून घेत त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याचा प्रयत्न होत असल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.बारामतीत आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबारामुळे सर्वसामान्य नागरिकांना आपले प्रश्न थेट मांडण्याचे व्यासपीठ मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवे शाळेत मुलींच्या विकासासाठी उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिंगवे पारगाव (समीर गोरडे) :** डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून व एलआयसी पेन्शन फंड लि यांच्या सहकार्याने शाळेतील किशोरवयीन मुलींसाठी एक स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला .

या उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवे शाळेमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन व डिसपोजल मशीन बसविण्यात आले. यामुळे विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या काळात स्वच्छता, आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठा लाभ होणार आहे. तसेच मुलींमध्ये मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज दूर होऊन स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य, मासिक पाळीतील घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता व स्वसंरक्षण या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले . यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन व स्वतःच्या आरोग्याबाबत जबाबदारीची भावना निर्माण झाली.

याशिवायपर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिन तसेच कळी उमलताना या मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. यामुळे आरोग्यविषयक जाणीवेसोबतच पर्यावरण संवर्धनाबाबतही विद्यार्थिनींमध्ये सजगता वाढण्यास मदत झाली.

जल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवे शाळांमध्ये हा उपक्रम रबविण्यात आला. ा उपक्रम शाळेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी असून, शाळेच्या वतीने डिसेंट फाउंडेशन व एलआयसी पेन्शन फंड लि यांचे मनःपूर्वक आभार मानले .

याप्रसंगी डिसेंट फाउंडेशन चे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ.एफ.बी. आतार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समीर गोरडे उपाध्यक्ष रेखा पाबळे ,मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर, जालिंदर पोंदे, श्रीकृष्ण डुकरे, विलास भोर, अशोक लोखंडे, सुभाष इंदोरे, वैजयंती लोखंडे, संगीता इंदोरे,आदी मान्यवर शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्तित होते .



## व्यावसायिक गॅस तुटवड्यामुळे लग्नसमारंभात स्वयंपाकाची अडचण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे लग्नसमारंभ व इतर मोठ्या कार्यक्रमांमध्ये स्वयंपाक करताना अडचणी निर्माण होत आहेत. गॅसचा पुरवठा कमी झाल्याने केटरिंग व्यवसायिक व मंगल कार्यालयांसमोर नियोजनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.लग्नसराईच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर स्वयंपाकाची व्यवस्था करावी लागते. मात्र व्यावसायिक गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक कार्यक्रमांमध्ये स्वयंपाक व्यवस्थापनात अडथळे येत आहेत.या पार्श्वभूमीवर कार्यक्रम सुरळीत पार पडावेत आणि ग्राहकांना अडचण येऊ नये यासाठी चुलांगणावर स्वयंपाक करण्याची सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे रमाकांत काळे, दादा पवार यांनी सांगितले यामुळे गॅसवरील अवलंबित्व कमी होऊन लग्नसमारंभातील स्वयंपाक वेळेत आणि व्यवस्थित पार पडण्यास मदत होणार असल्याचे संबंधितांनी सांगितले. ग्रामीण भागात पूर्वीपासून वापरल्या जाणाऱ्या या पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करणे सोपे होत असल्याने हा पर्याय ग्राहकांनाही उपयोगी ठरणार आहे.

**पुन्हा चुलांगणावर स्वयंपाक?**

सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा असल्यामुळे लग्नसमारंभातील स्वयंपाकासाठी अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या सोयीचा विचार करून लवकरच कार्यालयात आता पारंपरिक चुलांगणावर स्वयंपाक करण्याचा पर्याय उपलब्ध करून देणार आहोत दादासो पवार संचालक रिद्धी सिद्धी मंगल कार्यालय, दिवे

# कर्जत-जामखेड मतदारसंघात मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम सुरू

## मतदारांनी याद्या अद्यावत करण्यास सहकार्य करावे : प्रांताधिकारी नितीन पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२७ कर्जत-जामखेड विधानसभा मतदार संघात विशेष पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात आला असून सर्वसामान्य मतदारांनी यात सक्रिय सहभाग घेत बीएलओ यांना सत्य माहिती देत मतदार याद्या शुद्ध आणि अद्यावत करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन कर्जत प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले आहे.

कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अनुषंगाने सध्याच्या मतदार यादीतील मतदारांचे यापूर्वी झालेल्या सन २००२ विशेष संक्षिप्त पुनरीक्षणाच्या अंतिम यादीतील मतदारांची पडताळणी करण्याबाबत कार्यवाही चालू आहे. यासाठी विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावर मतदान केंद्र निहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच महसूल भागातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तरी कर्जत-जामखेड मतदारसंघातील सर्वसामान्य मतदारांनी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी यांनी आपली व आपल्या कुटुंबाबाबत माहिती विचारणा केल्यास त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. यासह

ज्या मतदारांची नावे सन २००२ च्या मतदार यादीत आहेत त्यांची नावे सन २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदारयादीत आहेत त्यांचे स्वयं पडताळणी आवश्यक आहे. तसेच ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत नाहीत परंतु २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या यादीत नाव आलेले आहे त्यांची पडताळणी करताना त्यांच्या वडिलांची माहिती सन २००२ च्या यादीतील (वडिलांचे विधानसभा मतदार संघ, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक) नमूद करून पडताळणी पार पडणार आहे.

त्यामुळे विवाहित महिला/ सुन यांची पडताळणी करताना त्यांच्या वडिलांच्या विधानसभा मतदार संघ, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक अशी माहिती बीएलओ यांना देण्यास नागरिकांनी सहकार्य करावे. त्यासाठी विवाहित महिलांच्या वडिलांच्या इपिक मतदार ओळखपत्राची प्रत उपलब्ध ठेवावी. जेणेकरून मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षणाचे काम बिनचूक व तंतोतंत होईल असे आवाहन प्रांताधिकारी नितीन पाटील, कर्जत तहसीलदार रवी सतवन यांनी केले आहे.

> अनेक वर्षांपासून मयत मतदार, दुबार नावे, स्थलांतरीत मतदार यांची नावे मतदार यादीत आढळून येत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मयत नावे, दुबार नावे यासह स्थलांतरीत मतदारांनी आपले नाव कमी करून मतदार यादी शुद्ध व अद्यावत बनविण्यासाठी सहकार्य करावे. यासह मतदारांनी त्यांची नावे कोणत्या यादी भागात आहेत याची माहिती द्यावी आणि प्रत्येक पात्र मतदारांनी आपली माहिती तपासणी करून नावे बीएलओ यांच्या द्वारे निश्चित करावे.
>
> –प्रांताधिकारी नितीन पाटील

द•ख•ल



### तवली–ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**पारनेर :** बुधवार दि. ११ मार्च २०२६

पारनेर तालुक्यातील म्हसोबा झाप-कन्हेर येथे आमदार काशिनाथ दाते सरांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर झालेल्या तवली- ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण कामाचे भूमिपूजन डॉ. प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या रस्त्यासाठी १० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सदर रस्ता पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस मोठी सोय होणार असून शेतकरी, विद्यार्थी तसेच कामानिमित्त ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कमी होऊन गावकुसातील वस्तीपर्यंत सहज वाहतूक होणार असल्याने ग्रामस्थांनी या विकासकामाचे स्वागत करत आमदार दाते सरांचे आभार मानले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेप्रती आमदार काशिनाथ दाते सरांना असलेली आत्मीयता आणि जिव्हाळा हा मतदारसंघाच्या विकासाचा खरा पाया आहे. जोपर्यंत सर मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत, तोपर्यंत सामान्य माणसाला न्याय मिळत राहील याबाबत मला अजिबात शंका नाही.

### जिल्हा परिषदेचे ५९.५५ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर; एआय लॅब आणि रोबोटिक्सवर भर

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सन २०२६-२७ या वर्षासाठीचे ५९ कोटी ५५ लाख रुपयांचे स्वउत्पन्नाचे मूळ अंदाजपत्रक प्रशासकीय सभेत मंजूर करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत कृषी, शिक्षण आणि तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण योजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे यांनी हे अंदाजपत्रक सादर केले. गेल्या वर्षीच्या ५२ कोटी ५४ लाखांच्या तुलनेत यंदा महसुली उत्पन्नात वाढ झाल्याने अर्थसंकल्पाचा आकार वाढला आहे. शिक्षण आणि शेतीत 'एआय'चा प्रवेश

या अंदाजपत्रकाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे प्राथमिक शाळांमध्ये एआय रोबोटिक लॅब आणि ओपन सायन्स पार्क विकसित करण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, कृषी क्षेत्रात 'प्रिसिजन फार्मिंग' अंतर्गत ऊस, डाळिंब व केळी पिकांच्या प्रात्यक्षिकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ख) वापर केला जाणार असून, त्यासाठी ९० लाख रुपये खर्च केले जातील. **महत्त्वाच्या योजना आणि तरतूद:**

शिक्षण : 'मिशन आरंभ' शिष्यवृत्ती सराव परीक्षांसाठी १ कोटी २२ लाख, मुलींना मोफत सायकल वाटपासाठी ६५ लाख, कृषी व पशुसंवर्धन: ड्रोन फवारणी यंत्रासाठी ४९ लाख, पशुपालकांना दूध काढणी यंत्रासाठी २० लाख आणि साथीच्या रोगात जनावरे मृत झाल्यास ३० लाखांची मदत.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'प्रज्ञा गुरुकुल-२' उपक्रमाचा यशस्वी समारोप




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथे कार्यरत असलेल्या महामानव बाबा आमटे सामाजिक विकास सेवा संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या प्रज्ञा गुरुकुल-२ या शैक्षणिक उपक्रमाचा नुकताच यशस्वी समारोप झाला. आदिवासी पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

संस्थेचे कार्यकर्ते अनंत झेंडे यांच्या माध्यमातून मागील १७ वर्षांपासून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी निवासी वस्तीगृह चालविण्यात येत आहे. या वस्तीगृहात विशेषतः पारधी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार आणि जीवनावश्यक कौशल्ये देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून प्रज्ञा गुरुकुल हा उपक्रम सुरू करण्यात आला.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना गणित, भाषा आदी विषयांसोबतच प्रात्यक्षिके, चर्चा, प्रयोग आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून शिकण्याची संधी देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आत्मविश्वास आणि जिज्ञासा वाढल्याचे दिसून आले.

या उपक्रमासाठी डॉ. सपना सेठ, मयूर सेठ, डॉ. प्रकाश सेठ, कीरीटी मोरे व ज्योती एकबोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच वंदना सोनटक्के, रुपाली स्वामी यांच्यासह अनेक शिक्षक व स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष काम करून उपक्रमाला बळ दिले.

वर्षभर चाललेल्या या उपक्रमाच्या समारोपावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्याचा संस्थेचा मानस आहे. दरम्यान, प्रज्ञा गुरुकुल हा केवळ शिक्षणाचा उपक्रम नसून आदिवासी मुलांमध्ये आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, असे मत डॉ. सपना सेठ यांनी व्यक्त केले.

## सरकारची कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरेल का ?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी शेतकऱ्यांसाठी पीक कर्जमाफीची महत्त्वपूर्ण घोषणा करत दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार असल्याचे विधीमंडळात सांगितले. या घोषणेनंतर राज्यातील गावागावांत, चावड्यांवर आणि पारावर शेतकऱ्यांच्या गप्पांना उधाण आले असून कर्जमाफीच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाले आहेत.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिल्याची आठवण करून देत अनेक शेतकरी आता या घोषणेचा नेमका अर्थ काय असा सवाल करत आहेत. विशेषतः दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.गावागावांत सध्या एकच चर्चा रंगली आहे की, ज्या शेतकऱ्यांनी तीन लाख रुपये पीक कर्ज घेतले आहे त्यांना दोन लाख रुपयांची कर्जमाफी मिळणार का? तसेच अशा शेतकऱ्यांनी उर्वरित एक लाख रुपये भरल्यास त्यांचे दोन लाख रुपये माफ होतील का, असा प्रश्न अनेक शेतकरी उपस्थित करत आहेत. श्रीगोंदा येथील शेतकऱ्यांनी बोलताना सांगितले की, सरकारने आमचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते. आता फक्त दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली जात आहे. मग आमचा सातबारा कोरा नेमका कधी होणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.ग्रामीण भागातील खेड्यातील शेतकरी यांनीही आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, सरकारने सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. आता दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा झाली आहे. त्यामुळे आमचा सातबारा पूर्णपणे कोरा होणार की नाही, याबाबत आम्हाला शंका वाटत आहे. तर काही शेतकरी सरकारवर टीका करताना म्हटले की, उद्योजकांची मोठमोठी कर्जे माफ केली जातात; मात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी करताना सरकार हात आखडता घेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.याशिवाय काही शेतकऱ्यांनी सरकारच्या इतर योजनांवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. लाडक्या बहिणी योजनेत महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यासाठी सरकारकडे निधी आहे; मात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी करताना मात्र टाळाटाळ होत आहे का? असा सवालही काही शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, सरकारकडून जाहीर झालेल्या दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीच्या योजनेचे नेमके निकष, पात्रता आणि अंमलबजावणीची प्रक्रिया स्पष्ट झाल्यानंतरच शेतकऱ्यांच्या मनातील संभ्रम दूर होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत मात्र गावखेड्यांतील चावड्या, पार आणि बाजारपेठांमध्ये कर्जमाफीवरून चर्चा सुरूच राहणार असल्याचे चित्र दिसत आहे.

**अंशतः तत्वतः मध्ये किती शेतकरी बसणार ?**

राज्य सरकाराने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये आतापर्यंत अटीशर्ती काय आहेत हे कोणालाही समजले नाही अथवा त्याचे परिपत्रक मिळालेले नाही त्यामुळे मागील कर्जमाफी प्रमाणे अंशतः तत्वतः मुद्दे समोर आले तर त्यामध्ये किती शेतकरी बसणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे .

## देशातील सर्वोत्तम अभियांत्रिकी जेईई मेन्स परीक्षेमध्ये द्रोण लगडचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**लिंपणगाव :** व्यंकनाथ विद्यालयातील माजी विद्यार्थी द्रोण पुरुषोत्तम लगड याने जे. ई. ई. मेन्स परीक्षेमध्ये ९८.६६% मिळवून उत्तम यश मिळवले आहे त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने द्रोणचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी द्रोणने विद्यालयातील शिकविणाऱ्या सर्व अध्यापकांचे भरीव असे मार्गदर्शन लाभले.

या यशामध्ये मला शिकवणाऱ्या माझ्या शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. व आशीर्वाद कारणीभूत असल्याचं सांगितले. त्याचे वडील पुरुषोत्तम लगड हेही विद्यालयाच्या स्कूल कमिटी मध्ये विद्यार्थी हिताच्या दृष्टीने सतत काम करत असतात. विद्यालयामध्ये शिकत असतानाच मूलभूत संकल्पना व्यवस्थित समजावल्यामुळे हे यश मिळवणे सोपे गेले असे यशवंत विद्यार्थी द्रोण दगड याने आवर्जून सांगितले.

प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत या विद्यालयातून असे अनेक विद्यार्थी उत्तुंग यश मिळवत उच्च पदस्थ झाले आहेत.

त्यामध्ये द्रोण लगडच्या या भरीव यशामुळे निश्चितच विद्यालयाची मान उंचावली गेली आहे असे सांगितले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, संचालक डी आर काकडे सर, आदींसह स्कूल कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी द्रोण लगडचे अभिनंदन केले आहे.

या कार्यक्रमास नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलासराव काकडे, स्कूल कमिटीचे सदस्य पुरुषोत्तम लगड, युवा नेते राजेंद्र काकडे, रविंद्र काकडे, निलेश लगड, संदीप जाधव, प्राचार्य बाळासाहेब जठार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन निसार शेख यांनी केले. आभार उपशिक्षक ज्ञानदेव धायगुडे यांनी मानले.

### जामखेडला खाजमोद्दीन बाबा दर्ग्याचा उरूस इफ्तार पार्टीने संपन्न

## मोगलपुरा यंग पार्टीचा आदर्श इतर संघटनांनी घ्यावा-पो.नि.चौधरी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड शहरातील जुनं जामखेड असलेल मोगलपुरा गल्ली या गल्लीत खाजमोद्दीन बाबा दर्गाची दर्गा प्राचीन कालापासून आहे . या दर्ग्याच्या दर्शनासाठी सर्व जाती धर्मातील नागरीक येतात. या दर्ग्याचा उरूस १३ मार्च रोजी सर्व जाती धर्मातील नागरीक मोठया उत्साहाने साजरा करतात . हा दर्गा म्हणजे जामखेड तालुक्यातील राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे. यावेळी जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी बोलतांना म्हणाले की मोगलपुरा यंग पार्टीने खाज ेद्दीन बाबा दर्ग्याचा उरूस हा रमजान महिन्यात आल्याने कोणताही गाजा वाजा न करता उपवासाची सांगता करून इफ्तार पार्टीने साध्या पद्धतीने व शांततेत साजरा करून समाजपुढे एक आदर्श निर्माण केला आहे . त्यांचा आदर्श इतर संघटांनी घेणे हि काळाची गरज आहे असे मत पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी व्यक्त केले . मुस्लीम बांधवानी रोजा सोडुन खाजमोद्दीन दर्ग्याला पो.नि दशरथ चौधरी, अमित चिंतामणी, उपनगरध्याक्ष पोपट राळेभात, नगरसेवक प्रा.विकी घायतडक, मोहन पवार, अर्जुन म्हेत्रे,शिवसेना युवा नेते आकाश बाफना, अभियंता प्रदीप कटकधोंडे सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार, उमर कुरेशी, शिवकुमार डोंगरे, मुस्लीम पंच कमिटीचे अध्यक्षअझहर काझी, मुख्तार सय्यद, इस्माईल शेख ,हाजी नादीर शेख ,कॉंग्रेसचे प्रदेश सचिव राहुल उगले, वसीम कुरेशी, आरीफ शेख ,प्रदीप टापरे, मयुर भोसले, सामाजिक कार्यकर्ते नासीर चाचु , जेष्ठ पत्रकार अशोक निमोणकर , सुदाम वराट , संजय वारभोग , विजय अवसरे , गोपनिय अधिकारी प्रकाश जाधव यांच्या हस्ते चादर चढवून मोठ्या आनंदाने उरूस साजरा केला .

## कटारनवरे वस्तीचा रस्ता बंद

### ग्रामस्थांची तहसीलदारांकडे धाव, तातडीने तोडगा काढण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** तालुक्यातील सांगवी खुर्द येथील कटारनवरे वस्ती कडे जाणारा अनेक वर्षांपासूनचा पुरातन रस्ता पूर्णपणे बंद झाल्याने येथील ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. गावाशी जोडणारा हा एकमेव मार्ग बंद झाल्यामुळे वस्तीवरील नागरिकांना गावात ये-जा करणे अत्यंत कठीण झाले असून शाळकरी मुले मुली , शेतकरी, वृद्ध आणि अपंग नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी ग्रामस्थांनी तहसील कार्यालय गाठत तहसीलदार उद्धव नाईक यांना निवेदन देऊन आपली व्यथा मांडली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कटारनवरे वस्ती कडे जाणारा हा रस्ता ओढ्यामधून नदीकाठाने जात होता आणि सुमारे १० ते १२ फुट रुंदीचा हा मार्ग तब्बल ४० ते ५० वर्षांपासून ग्रामस्थांच्या वापरात होता. या मार्गाचा वापर करून शेतकरी आपल्या शेतात ये-जा करत, शेतीची मशागत, कृषी यंत्रसामग्री ने-आण, जनावरे नेणे तसेच दैनंदिन प्रवासही याच मार्गाने करत होते. सन १९९१ पर्यंत हा रस्ता नियमित वापरात असल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.

यावेळी ग्रामस्थांनी आपल्या रोजच्या हालअपेष्टांची कहाणीही प्रशासनासमोर मांडली. तहसीलदारांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागाशी चर्चा करून लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

याबाबत अधिक माहिती छानराज शेत्रे व ग्रामस्थ हिरामण कटारनवरे यांनी दिली.

यावेळी छानराज शेत्रे, हिरामण कटारनवरे, अतुल कटारनवरे, अंबादास कटारनवरे, दाविद कटारनवरे, बन्सी कटारनवरे आणि गोरख कटारनवरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

## टाकळी ढोकेश्वर येथील पोलीस ठाण्याला अंतिम मंजुरी

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत टाकळी ढोकेश्वर येथे आज (शुक्रवार दि. १३ मार्च २०२६)

स्वतंत्र पोलीस ठाण्याला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील अनेक गावांना नजीकच पोलीस प्रशासनाची सुविधा उपलब्ध होणार असून नागरिकांना तातडीने सेवा मिळणार आहे.

पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तालुक्यात वाढत्या लोकसंख्येचा आणि भौगोलिक विस्ताराचा विचार करून नवीन पोलीस ठाण्यांची गरज सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर गतवर्षी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच शासनाने अखेर हा निर्णय घेत राजपत्राद्वारे अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

या नव्या पोलीस ठाण्यांच्या कार्यान्वयनामुळे तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, सावरगाव, ढोकी, नांदुर पठार, कर्जुले हर्या, काटाळवेढा, वनकुटे, पळसपुर, मांडवे खुर्द, कासारे, खडकवाडी, म्हसोबाझाप, देसवडे, वारणवाडी, वासुंदे, गारगुंडी, वडगाव सावताळ, ढवळपुरी, पळशी, काकणेवाडी, पोखरी, हिवरे कोरडा, पिंपळगाव रोठा, माळकुप, अक्कलवाडी, काळकुप, तिखोल, भनगडेवाडी, कारेगाव, डोंगरवाडी, धोत्रे खुर्द, भोंद्रे, धोत्रे बु, तास, गाजदीपूर अशा एकुण पस्तीस गावांचा समावेश टाकळी ढोकेश्वर या स्वतंत्र कार्यक्षेत्रात होणार असून गुन्हे प्रतिबंध, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे अधिक सुलभ होणार आहे.

या निर्णयामुळे पारनेर पोलीस ठाण्यावरील पूर्वीचा भार कमी होणार असल्याने सबंधित पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील पारनेर शहर, विरोली, पुणेवाडी, हातलखिंडी, सिध्देश्वरवाडी, बहिरोबावाडी, पानोली, कान्हुरपठार, वडुले, पिंपळगाव तुर्क, राळेगणसिध्दी, पिंपळनेर, वडगाव दर्या, भांडगाव, वेसदरे, वडगाव आमली, पिंप्री पठार, दैठणे गंजाळ, शेरी कोलदरा, सारोळा आडवाई, निघोज, किन्ही, जामगाव, गांजीभोयरे, लोणी हवेली, पिंप्रीजलसेन, शिरापुर, सांगवीसूर्या, चोंभुत, जवळा, रेनवडी, गुणोरे, पाडळी आळे, गाडीलगाव, कळस, राळेगण थेरपाळ, आळकुटी, हाकीगतपुर, माजमपुर, म्हस्के वाडी, कोहकडी, शेरीकासारे, मोरवाडी, पाबळ, म्हसे खुर्द, गारखिंडी, दवाणवाडी, वडझिरे, पठारवाडी, लोणी मावळा, चिंचोली, देवीभोवरे, दरोडी, वडगाव गुंड, पाडळी दर्या, शिरसुले, बाभुळवाडे, वडनेर बु, जाधववाडी, भाळवणी, रांधे, गोरेगाव, डिस्कळ, पाडळी तर्फे कान्हुर, कुरुंद, करंदी या सहसष्ट गावांतील नागरिकांनाही सुरळीत सुविधा मिळणार आहे.

संपूर्ण पारनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संपूर्ण एकशे एक गावांतील नागरिकांना या नवीन मंजुरीमुळे सुरळीत सुविधा मिळणार असल्याने व या अगोदरच सुपा पोलिस ठाण्याचा स्वतंत्र कारभार सुरु असल्याने संपूर्ण तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार दाते सरांच्या प्रभावी पाठपुराव्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

### महिलांनी आज आपआपल्या क्षेत्रामध्ये कर्तव्य सिद्ध करून दाखवले : दारवेकर

**अहिल्यानगर :** अहमदनगर शहर सहकारी बँक यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला. नवीपेठ येथील कै. मुकुंद घैसास सभागृहात आयोजित या कार्यक्रमास बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, संचालिका रेश्माताई आठरे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, सीनियर ऑफिसर प्रकाश वैरागर, संध्या मेढे, अमृता दारवेकर आदींसह महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रसंगी बोलताना अमृता दारवेकर म्हणाल्या की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करून दाखवली आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत. अहमदनगर शहर सहकारी बँकेतील महिला कर्मचारी ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

# गुन्हेगारांना दणका: बॉण्डचे उल्लंघन करणाऱ्या दोघांची रवानगी कोठडीत, एकाला दंड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : गुन्हेगारी कारवायांना लगाम घालण्यासाठी श्रीरामपूर पोलिसांनी अट्टल गुन्हेगारांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तामसवाडी येथील हरीहर ऊर्फ बंटी औटी आणि पानेगाव येथील आकाश तांबे या दोन आरोपींची जामीनदार हजर न केल्याने न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. तसेच, शांततेच्या बंधपत्राचा (बॉण्ड) भंग केल्याप्रकरणी घोडेगाव येथील अक्षय चेमटे याच्याकडून ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सोनई पोलिसांनी ही कारवाई केली. या धडक कारवाईमुळे सोनई परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तींना जरब बसली असून पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.



## गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या अचानक वाढीच्या निषेधार्थ श्रीरामपूर विधानसभा काँग्रेसच्यावतीने आ. हेमंत ओगले व नगराध्यक्ष करण ससाणे यांचे मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांवर आधीच आर्थिक ताण वाढलेला असताना गॅस सिलेंडरच्या दरवाढीमुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त करत गॅस दरवाढीचा निषेध केला. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे, काँग्रेसच्या प्रदेश सचिव दिपाली ससाणे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, जि.प. चे माजी सदस्य बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, अशोक बागुल, काँग्रेसचे शहराध्यक्ष आण्णासाहेब डावखर, लकी सेठी, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुध्दे, विलास दाभाडे, नगरसेवक कलीम कुरेशी, दिपक वमने, सुभाष सुभाष पोटे, महंता यादव, भाग्येश लोखंडे, विलास लबडे, विलास पुंड, सुरेश ठुबे, रावसाहेब आल्हाट, अशोक जगधने, नवाज जहागिरदार, सुनिल साबळे, नजीर शेख, सनी मंडलिक, संजय गोसावी, विशाल साळवे, अभिजीत लिप्टे, नगरसेवक गोपाल लिंगायत, सुधीर वायखिंडे, कान्हेगावचे उपसरपंच अतुल खरात आदींसह श्रीरामपूर विधानसभा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले, केंद्र सरकारने तात्काळ गॅस सिलेंडरची दरवाढ मागे घ्यावी, अगोदरच महागाईमुळे नागरिकांचे जीवन अधिक कठीण होत असून सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करत गॅस दरवाढीचा निषेध केला. सामान्य जनतेच्या हितासाठी आणि वाढत्या महागाई विरोधात हे आंदोलन करण्यात आल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान महागाई कमी करा, गॅस दरवाढ मागे घ्या आणि सामान्य नागरिकांना दिलासा द्या, अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलकांच्या वतीने तहसीलदार मिलींदकुमार वाघ यांना निवेदन देण्यात आले.

## रेल्वे विभागाने अन्य पर्यायी मार्गाचा विचार करावा : ना. विखे

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात झाली बैठक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : नासिक पुणे प्रस्तावित रेल्वे मार्ग संगमनेर अकोले तालुक्यातील मूळ मार्गाने नेण्याच्या दृष्टीने रेल्वे विभागाने अन्य पर्यायी मार्गाचा सकारात्मकतेने विचार करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. पुणे नासिक प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती.मंत्री वैष्णव यांनी अधिकार्याना केलेल्या सूचनेनूसार मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीला आ.अमोल खताळ यांच्यासह रेल्वे विभागाचे राजेश कुमार शर्मा प्रशासकीय अधिकारी भुनेश्वर कुमार मुख्य अधिकारी विजय कुमार राय यांच्यासह विकास क्रांती सेना रेल्वे कृती समितीचे किशोर डोके भगवान काळे सतिष फापाळे जालिंदर गागरे संतोष शेळके यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत रेल्वे विभागाने प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.प्रस्तावित मार्गामध्ये झालेल्या बदलानंतर संगमनेर अकोले तालुक्यातील नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात तीव्र संताप व्यक्त करण्यात आल्याची बाब मंत्री विखे पाटील यांनी रेल्वे अधिकार्यांच्या निदर्शनास आणून दिले.बदल करताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले नसल्याची बाब गांभिर्याने मांडण्यात आली. लोकांची मागणी लक्षात घेवून जीएमआरटीला अडचण होणार नाही असा पर्यायी मार्ग निर्माण करण्यासाठी रेल्वे विभागाने सकारात्मकतेने विचार करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या.याबाबत रेल्वे विभाग सकारात्मक भूमिका घेवून नव्याने पुन्हा सरेखन करण्याबाबत विचार करीत असल्याचे अधिकार्यांनी आश्वस्त केले.

मूळ मार्गात ज्या गावांचा समावेश होता त्या गावात आ.अमोल खताळ यांच्या समवेत प्रत्यक्ष जावून रेल्वे विभागाने पाहाणी करण्याचे मंत्री विखे पाटील यांनी सूचित केले.पुणे नासिक रेल्वे मार्गाच्या प्रश्नाबाबत मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत संगमनेर अकोले तालुक्याला न्याय मिळेल आशी भूमिका मांडण्यात आली असून,अंतिम निर्णय होण्याकरीता लवकरच केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेणार असल्याचे आ.अमोल खताळ यांनी सांगितले.

## पोलिसांची संवेदनशीलता मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी महत्त्वाची

### पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा हा संवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जातो. सद्यस्थितीत बालकांवरील अत्याचार आणि छेडछाडीच्या घटना चिंताजनक आहेत. जर पोलिसांनी अधिक संवेदनशीलता दाखवली आणि वेळीच हस्तक्षेप केला, तर मुलींवरील अत्याचार आणि छेडछाडीचे गुन्हे निश्चितपणे रोखता येऊ शकतील, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि स्नेहालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पोलीस दीदी' प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी पोपट धामणे, स्नेहालयचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. विनय कोपरकर, ड. श्याम आसावा, पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे आदी मान्यवर उपस्थित होते.

ड. श्याम आसावा यांनी 'पोलीस दीदी' संकल्पना स्पष्ट करताना सांगितले की, पोलीस दीदी या विद्यार्थ्यांच्या संरक्षक, मित्र आणि मार्गदर्शक म्हणून काम करतील. वेळेवर मिळालेली मदत मुलांचे भविष्य सुरक्षित करू शकते. डॉ. विनय कोपरकर म्हणाले, मुलांशी संवाद साधताना 'खुले प्रश्न' विचारल्यास ती अधिक बोलकी होतात आणि त्यांची विचारधारा समजण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले. संकटग्रस्त मुलांशी संवाद साधताना त्यांचा विश्वास जिंकणे आणि गोपनीयतेची जपणूक करणे आवश्यक असल्याचे डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी सांगितले.

तर डॉ. तेजस्विनी मिस्कीन यांनी बालकांच्या मानसिक आणि भावनिक स्थितीवर प्रकाश टाकत, भीती आणि अस्वस्थतेमुळे त्यांच्या वर्तनात होणाऱ्या बदलांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या घोरपडे यांनी केले, तर आभार संतोष धर्माधिकारी यांनी मानले. या कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पोलीस दीदी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी स्नेहालयच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

> **'पोलीस दीदी' उपक्रमाची गरज**
>
> शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेसाठी 'पोलीस दीदी' सारखे उपक्रम जिल्ह्यात व्यापक स्तरावर राबवणे काळाची गरज आहे. केवळ गुन्ह्यांचा तपास करणे एवढेच पोलिसांचे काम नसून, छेडछाड किंवा पाठलाग यांसारख्या गोष्टींची गंभीर दखल घेऊन संभाव्य मोठा गुन्हा टाळणे महत्त्वाचे आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थिनींना विश्वासात घेऊन काम केल्यास लैंगिक अत्याचाराच्या घटनांत घट होईल.
>
> **सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस अधीक्षक**

## १७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर बोरसरच्या पाटाला आले पाणी; शेतकऱ्यांकडून जलपूजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील बोरसर परिसरातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. कोल्ही प्रकल्पातून सोडण्यात आलेले आवर्तनाचे पाणी तब्बल १७ वर्षांच्या प्रदीर्घ खंडानंतर बोरसरच्या गट नंबर ३१ पर्यंत पोहोचले आहे.

पिके सुकू लागल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाकडे केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, शनिवारी पाण्याचे आगमन होताच शेतकऱ्यांनी जल्लोषात जलपूजन केले. नांदूर मधमेश्वर प्रकल्पाचे उपअभियंता सुशील पाटील, शाखा अभियंता पवन चव्हाण आणि मोजणीदार रमेश जाधव यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पाटातील तांत्रिक अडथळे दूर केल्याने हे पाणी बोरसरपर्यंत पोहोचू शकले.

यामुळे सुमारे ४३२ हेक्टर सिंचन क्षेत्राला दिलासा मिळाला आहे. यावेळी अप्पासाहेब जिवरग, रमेश पवार, संदीप पवार यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## सद्गुरू किसनगिरीबाबांचा पुण्यतिथी सोहळा उत्साहात; भजनाने भाविक मंत्रमुग्ध



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : सावेडी उपनगरातील संत किसनगिरीनगर येथील 'गुरुदत्त भक्तिधाम' येथे श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबांचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेच्या वातावरणात साजरा झाला. 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'सद्गुरू किसनगिरीबाबां'च्या जयघोषाने सावेडी आणि भिस्तबाग परिसर दुमदुमून गेला होता. देवगड संस्थानचे प.पू. गुरुवर्य भास्करगिरी महाराज आणि स्वामी प्रकाशानगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे श्रींच्या अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर भाविकांनी 'श्री किसनगिरी विजय' या ग्रंथाचे सामुदायिक पारायण केले, ज्यामुळे परिसरात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली. दुपारी हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. रात्री ९ ते ११ या वेळेत गोरक्षनाथ दुतारे महाराज यांच्या 'गुरुभक्ती' भजन संध्येने भाविकांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्याला महापौर ज्योती गाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, दिपाली बारस्कर, डॉ. सागर बोरुडे, किरण बारस्कर, जालिंदर बोरुडे यांसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन दर्शन घेतले. यावेळी नगर भक्त मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबा नगर भक्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या सोहळ्याचे उत्तम नियोजन केले होते.

## हरिगांव येथे आज आकारी पडीत शेतकऱ्यांचा एल्गार मेळावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील शेती महामंडळाच्या हरिगांव मळा मुख्य कार्यालयासमोर ब्राम्हणगांव फाटा येथे आज शनिवार दि.१४ मार्च रोजी ठिक ४ वाजता ९ गावांतील सर्वपक्षीय आकारी पडीत शेतकऱ्यांचा संभाजीनगर उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ अँड अजित काळे यांचे मार्गदर्शनाखाली भव्य एल्गार मेळावा संपन्न होणार आहे.

शेती महामंडळाच्या हरिगांव मळा कार्यक्षेत्रातील ९ गावातील शेतकऱ्यांच्या आकारी पडीत जमिनी मुळ वारसांना परत मिळवण्यासाठी संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिकाकर्ते गिरीधर आसने यांनी यांनी याचिका दाखल केली होती. याचिकेवर उच्च न्यायालयात शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांनी यशस्वीपणे बाजू मांडली. तत्कालीन महसूलमंत्री व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी विचारविनिमय करून अँड अजित काळे हे न्यायालयात लढाई जिंकले.मंत्रिमंडळ बैठकीतही मंजुरी देण्यात येऊन राज्यपाल यांच्याकडे स्वाक्षरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला.

महसूल मंत्री ना चंद्रशेखर.बावनकुळे यांची व राज्यपाल यांनी ड. अजित काळे यांच्यासमवेत ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घडवून आणली. तरी मुळ मालकांना जमिनी परत करण्यासाठी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस सरकारने व राज्यपाल यांनी उच्च न्यायालयाचे निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतलेली नाही. याउलट शेती कसण्यासाठी योग्य सुपीक ४००० एकर जमिनी उद्योजकांना उद्योगासाठी देण्याचा सरकारने घाट घातला आहे.हा मुद्दा सद्यस्थितीत विधानसभा अधिवेशनात गाजतो आहे.

या सर्व परिस्थितीत हरिगांव मळा परिसरातील शिरसगाव, ब्राम्हणगांव, उंदीरगांव, खैरी निमगांव, वडाळा महादेव, मुठेवाडगांव, माळवाडगांव, खानापूर येथील शेतकरी कुटुंबातील तरुण वर्गासह महिला भगिनी जागृत झालेल्या आहे. अँड अजित काळे यांचे मार्गदर्शनाखाली सर्वपक्षीय एल्गार मेळाव्याची जोरदार तयारी सुरू आहे. हा मेळावा यशस्वीतेसाठी ब्राम्हणगांव, उंदीरगांव, माळवाडगांवसह सर्व ९ गावातील शेतकरी संघटनेसह सर्वपक्षीय शेतकरी जोरदार तयारी करत आहे.

## नारायणगिरी महाराजांनी समाजाला ज्ञानरूपी सुगंध दिला : रामगिरी महाराज



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या परंपरेत गुरूवर्य नारायणगिरी महाराज यांनी लाखो समाज एका छताखाली जोडण्याचे कार्य केले. आजही त्यांचे शब्द भक्तांच्या स्मरणात असून ज्ञानरूपी सुगंध प्रत्येकाच्या हृदयात दरवळतो आहे. अशा संताचे जीवन परोपकारासाठी असल्याचे प्रतिपादन श्री श्रेत्र गोदाधाम सराला बेटचे महंत रामगिरी महाराज यांनी केले. सद्गुरू नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी सोहळ्यात कीर्तन प्रसंगी संत निळोबारायांच्या मार्ग दावूनी गेले आधी दयानिधी संत ते, या अभंगवाणीतून भाविकासमोर निरूपण करताना ते बोलत होते.

महंत रामगिरी महाराज पुढे म्हणाले की, लहानपणापासून सद्गुरू नारायणगिरी महाराज यांना अध्यात्माची गोडी होती. अनेक महापुरुषाच्या जीवनात संघर्ष असतो. महाराजांनी संघर्ष करुन बेटाची व्याप्ती वाढवली. संकट ही एक संधी असते, जीवनात संकटावर जो मात करतो. तोच यशस्वी होतो. संकटे ही जीवंत माणसाकडेच येत असतात. निर्जीवाकडे नाही. नारायणगिरी महाराज हे बेटाला व समाजाला मिळालेले एक रत्न होते.

महाराजांनी आयुष्यभर कीर्तन प्रवचनातून लाखो भाविक भक्त बेटाला जोडून ठेवले. बेटातील त्यांच्याच परंपरा व आध्यात्मिक कार्य आम्हाला पुढे न्यायचे आहे. सद्गुरू संत हे अमर असतात कारण तत्वरुपाणे ते आपल्यातच असतात संत आणि देव भिन्न नसतात. देवाप्रमाणे संताच्या लिला अलौकिक असतात. रानावनात हिंडून संतपण मिळत नाही. जादूटोणा, करणी सांगणारे संत नसतात तर समाजातील अनिष्ट प्रथा रुढी याबद्दल समाजात जाऊन कथा किर्तनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवणारे, अंतःकरणात जिज्ञासा निर्माण झालेले खरे संत असतात. ते कार्य सद्गुरू नारायणगिरी महाराज यांनी केले असल्याचे यावेळी महंत रामगिरी महाराज म्हणाले.

याप्रसंगी महालगाव गटाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अविनाश गलांडे, वांजरगाव गटाचे पंकज ठोंबरे, लासूर गटाचे सुभाष तांबे, नगरसेवक संजय बोरणारे, धनंजय धोर्डे, निरज मुरकुटे, अमोल मलिक, सतिष शिंदे, दत्तु खपके, रामदरबार आश्रमचे हरिशरणगिरी महाराज, शिवगिरी आश्रमाचे संदिपान महाराज, विश्वनाथगिरी महाराज, अर्जुनगिरी महाराज, कल्याण महाराज पवार, बाळासाहेब महाराज रंजाळे, रामभाऊ महाराज नादीकर, विक्रम महाराज, साई महाराज, संतोष महाराज सोळंकी, रावसाहेब महाराज वेताळ, गुंजाळ महाराज, दादासाहेब तोडमल, एकनाथ पवार, बहिरट महाराज, सुभाष भराडे, सोपानराव औताडे, नामदेव आदिक, गणेश महाराज, सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज यांच्यासह भाविक उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यातील गावागावातून भाविकांनी आणलेल्या पुरणपोळी, मांडेचा तसेच दुधाचा महाप्रसाद भाविकांना देण्यात आला. सकाळपासून योगीराज गंगागिरी महाराज व सद्गुरू नारायणगिरी महाराज यांच्या समाधी दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. सायंकाळपर्यंत लाखो भाविकांनी दर्शनासाठी लाभ घेतला.